पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २४० । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | रविवार ०४/१०/२०२६ । पान- ६

सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी

१९५९ पासून
राजेंद्र
विश्वासाची सार्थ परंपरा...
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# दूध भेसळीवर प्रशासनाची करडी नजर

## उत्पादकापासून खरेदीदारापर्यंत दुधाची १८ मुद्द्यांवर तपासणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - दूधभेसळीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने आता उत्पादकापासून ते दूध संकलन केंद्र, प्रक्रिया केंद्र आणि अंतिम खरेदीदारापर्यंत दुधाची साखळी तपासण्याचा निर्णय घेतला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यातील सर्व सहआयुक्तांना याबाबत आदेश दिले असून, दुधाची विविध १८ मुद्द्यांवर तपासणी करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील दूध संकलन केंद्रे आणि दूध संस्थांच्या कामकाजाची पुन्हा पडताळणी होणार असून, भेसळ आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी दूधभेसळीविरोधात मोहीम तीव्र केली आहे. पुणे जिल्ह्यातील दूधभेसळीच्या रॅकेटचा पर्दाफाश केल्यानंतर आता राज्यभर दूध उत्पादक ते ग्राहक या संपूर्ण साखळीवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. विशेषतः दूध संकलन केंद्रांवर प्रशासनाची नजर राहणार आहे. दुधाची तपासणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने फॉसकॉस (ऋडडउेड) पोर्टलवर १८ तपासणी मुद्दे निश्चित केले आहेत. या निकषांनुसार दूध उत्पादक, संकलन केंद्र, प्रक्रिया केंद्र तसेच पुढील खरेदीदार यांच्याकडून दुधाची गुणवत्ता आणि व्यवहाराची पडताळणी केली जाणार आहे. तपासणीची नोंद ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार असून, दोष आढळल्यास संबंधितांविरोधात नियमानुसार कारवाई केली जाणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात दररोज सुमारे ४६ ते ४८ लाख लिटर दुधाचे संकलन होते. जिल्ह्यात दूध प्रक्रिया तसेच दुधापासून पावडर तयार करणारे उद्योगही मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील दूध व्यवसायाची व्याप्ती लक्षात घेता, प्रशासनाच्या या मोहिमेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दरम्यान, अन्न व औषध प्रशासन आणि पोलिसांनी यापूर्वी जामखेड, राहुरी आणि अहिल्यानगर परिसरात दूधभेसळ करणाऱ्यांवर कारवाई केली आहे. जामखेड येथे छापा टाकून कृत्रिम दूध तयार करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य व तयार केलेले कृत्रिम दूध जप्त करण्यात आले होते. या प्रकरणात ३७ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिसांकडून तपास सुरू आहे. राहुरी तालुक्यातही घातक रसायनांचा वापर करून कृत्रिम दूध तयार केले जात असल्याचे कारवाईत समोर आले होते.

कारवाईनंतरही जिल्ह्यात दूधभेसळीचे प्रकार सुरूच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे केवळ दूध विक्रीच्या ठिकाणी तपासणी न करता दूध उत्पादनापासून प्रक्रिया आणि अंतिम खरेदीदारापर्यंत संपूर्ण साखळीची तपासणी करण्यावर प्रशासनाने भर दिला आहे. (पान ४ वर)

# भारताचा पाकिस्तानवर दणदणीत विजय

## क्रिकेटमध्ये सलग दुसरे सुवर्ण!



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेटमध्ये भारताने पुन्हा एकदा आपला दबदबा सिद्ध करत पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला आहे. अंतिम सामन्यात भारताने पाकिस्तानसमोर २१२ धावांचे आव्हान ठेवले. या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ १९२ धावांपर्यंतच मजल मारू शकला. या विजयासह भारताने क्रिकेटमध्ये सलग दुसऱ्यांदा सुवर्णपदकावर आपले नाव कोरले आहे.

याआधी महिला क्रिकेटमध्येही भारतीय संघाने सुवर्णपदकाची कमाई केली होती. सुवर्णपदकासाठी झालेल्या सामन्यात भारताने श्रीलंकेवर एकतर्फी विजय मिळवत स्पर्धेतील पहिले सुवर्णपदक पटकावले होते. आता श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पुरुष संघाने पाकिस्तानला नमवत भारताच्या पदकतालिकेत आणखी एका सुवर्णपदकाची भर घातली. अंतिम सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताची सुरुवात मात्र अपेक्षेप्रमाणे झाली नाही. वैभव सूर्यवंशी अवघ्या १५ धावांवर बाद झाला, तर संजू सॅमसनला केवळ २ धावांवर माघारी परतावे लागले. मात्र अभिषेक शर्माने संयमी सुरुवातीनंतर आक्रमक फलंदाजी करत डावाला वेग दिला. अभिषेक शर्माने अवघ्या ६१ धावांची वादळी खेळी करत भारताच्या डावाचा पाया मजबूत केला. त्याला श्रेयस अय्यरने २१ धावांची साथ दिली. त्यानंतर इशान किशनने २० धावांचे योगदान दिले. डावाच्या अखेरीस तिलक वर्मा आणि शिवम दुबे यांनी पाकिस्तानच्या गोलंदाजांची जोरदार धुलाई केली. तिलक वर्माने नाबाद ५१ धावांची शानदार खेळी साकारली, तर शिवम दुबेने २१ धावा केल्या. भारताने २० षटकांत २११ धावा केल्या.

२१२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवातच अडखळली. फरहान १०, सदाकत २३ आणि यष्टिरक्षक उस्मान खान अवघ्या ३ धावांवर बाद झाले. सॅम अयुबने २९ धावांचे योगदान दिले. त्यानंतर हसन नवाजने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. अखेर पाकिस्तानचा डाव १९२ धावांवर थांबला आणि भारताने अंतिम सामन्यात विजय मिळवत सुवर्णपदकावर शिक्कामोर्तब केले.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी दप्तर तपासणी

## साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांची शिक्षणमंत्र्यांकडे मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून घडणाऱ्या गैरप्रकारांना तसेच बालगुन्हेगारीच्या प्रवृत्तीला प्रतिबंध करण्यासाठी प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांच्या दप्तरांची आठवड्यातून किमान एकदा आकस्मिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्रातील शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलांमध्ये अलीकडच्या काळात वयाला न शोभणाऱ्या गैरप्रकारांची तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीची रुजवण होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. या घटनांकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून न पाहता त्यामागील कारणांचा गांभीर्याने शोध घेऊन शालेय पातळीवरच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे डॉ. कळमकर यांनी म्हटले आहे.

प्रत्येक गंभीर घटनेनंतर त्यामागील कारणांचा शोध घेतला जातो. अनेकदा या कारणांचा एक धागा विद्यार्थ्यांच्या दप्तरापर्यंत पोहोचतो. विद्यार्थ्यांचे दप्तर हे त्यांच्या दैनंदिन जगण्याचे प्रतिबिंब असते. त्यामध्ये पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याबरोबरच व्यसनाशी संबंधित वस्तू, धारदार साहित्य किंवा इतर अनुचित वस्तू आढळण्याची शक्यता असते. अशा वस्तू वेळीच निदर्शनास आल्यास विद्यार्थ्यांचे समुपदेशन करून भविष्यातील गंभीर घटना टाळण्यास मदत होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले.

प्रत्येक प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळेत आठवड्यातून किमान एकदा विद्यार्थ्यांच्या दप्तरांची आकस्मिक तपासणी करण्यात यावी. तपासणीची तारीख व वेळ विद्यार्थ्यांना किंवा संबंधित वर्गांना पूर्वसूचित करू नये, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

ही तपासणी कोणत्याही विद्यार्थ्याला दोषी ठरविण्यासाठी किंवा त्याच्यावर संशय घेण्यासाठी नसून, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी आणि संभाव्य गैरप्रकारांना सुरुवातीलाच आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून करण्यात यावी. तपासणीदरम्यान अनुचित वस्तू आढळल्यास (पान ४ वर)

# पुणे-नाशिक रेल्वेसाठी 'जागरण गोंधळ'

## संगमनेर-अकोले मार्गे रेल्वे धावावी; ग्रामस्थांनी आंदोलनातून वेधले शासनाचे लक्ष




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक रेल्वे मार्गावर संगमनेर-अकोले मार्गे रेल्वे सेवा सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी देवगाव ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत भव्य जागरण गोंधळ आंदोलन केले. पारंपरिक पद्धतीने करण्यात आलेल्या या आंदोलनातून ग्रामस्थांनी पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाच्या मार्गाबाबत शासनाचे लक्ष वेधले.

पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाच्या चर्चेदरम्यान संगमनेर व अकोले तालुक्यांतून रेल्वे मार्ग नेण्यात यावा, अशी मागणी सातत्याने पुढे येत आहे. संगमनेर-अकोले मार्गे रेल्वे धावल्यास या भागातील नागरिकांना पुणे आणि नाशिक या दोन महत्त्वाच्या शहरांशी थेट रेल्वे जोडणी उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे या मार्गाचा विचार गांभीर्याने करावा, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली.

देवगाव येथे झालेल्या जागरण गोंधळ आंदोलनादरम्यान 'संगमनेर-अकोले मार्गेच पुणे-नाशिक रेल्वे' या मागणीवर ग्रामस्थांनी जोर दिला. रेल्वे मार्गाच्या निर्णयामध्ये संगमनेर व अकोले तालुक्याच्या भौगोलिक, सामाजिक व आर्थिक गरजांचा विचार करण्यात यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

संगमनेर-अकोले मार्गे पुणे व नाशिकला रेल्वे जोडणी झाल्यास विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, नोकरदार, उद्योजक तसेच सर्वसामान्य प्रवाशांना त्याचा फायदा होऊ शकतो. प्रवासाचा वेळ व खर्च कमी होण्याबरोबरच या भागातील व्यापार, उद्योग आणि रोजगाराच्या (पान ४ वर)










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
- अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
- माफक दरात - संगमनेर येथेच
- 105 बेड्स
- तज्ञ डॉक्टर्स
- अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# इनरव्हील क्लब ऑफ संगमनेर आयोजित करणार ‘दिल से दांडिया... दांडिया नाईट’

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त महिलांसाठी खास ‘दिल से दांडिया...दांडिया नाईट’ या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर येथे हा रंगतदार कार्यक्रम होणार आहे.




‘गरब्याचा ताल, सख्यांची साथ रंग दे नवरात्रीची प्रत्येक रात!’ या संकल्पनेवर आधारित या दांडिया नाईटमध्ये महिलांना पारंपरिक वेशभूषेत गरबा आणि दांडियाचा आनंद घेता येणार आहे. कार्यक्रमात Flash Mob, Lucky Draw तसेच विविध आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

यावेळी IWC Dandiya Queen, Dandiya Queen, Best Dandiya Pair, Best Mother Kid, Best Dandiya Kid, Best Saas-Bahu आणि Best Performer (५० वर्षांवरील) अशा विविध गटांमध्ये पुरस्कार दिले जाणार आहेत. ५-१०, ११-१८, १९-३५ आणि Open अशा वयोगटांमध्ये स्पर्धा होणार असून प्रत्येक गटासाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

कार्यक्रमासाठी प्रवेश शुल्क केवळ ८० असून प्रवेश फक्त महिलांसाठी आहे. डांडिया सुरू होण्यापूर्वी सायंकाळी ६.३० वाजता गेट बंद करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात येणार आहे. सहभागी महिलांनी कमीत कमी सहा जणांचा समूह करणे आवश्यक असून प्रत्येक ग्रुपसाठी ४ मिनिटांचा वेळ देण्यात येणार आहे. ग्रुप डान्समध्ये सहभागी महिलांनी आपल्या गाण्याची निवड करून ती आधीच पाठविण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. परीक्षकांचा अंतिम निर्णय सर्वांसाठी बंधनकारक राहील.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अध्यक्षा वैशाली चोपडे, उपाध्यक्षा दीपमाला भोत, सचिव अश्विनी ढोले आणि खजिनदार प्रियांका शहा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प प्रमुख पूजा हासे, रोहिणी गागरे, योगिता पावसे, प्रियांका दिघे, आरती मणियार, तेजस्विनी ढोले, सुजाता पेंडभाजे, वसुधा वाकचौरे आणि सुप्रिया घोडेकर परिश्रम घेत आहेत.

संगमनेर शहरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन ‘दिल से दांडिया...दांडिया नाईट’ चा आनंद घ्यावा, असे आवाहन इनरव्हील क्लब ऑफ संगमनेरच्या वतीने करण्यात आले आहे.

# संगमनेरमध्ये रविवारी टंचाई आढावा बैठक

## पालकमंत्री विखे पाटील, आ. अमोल खताळ यांच्या उपस्थितीत आढावा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळ व पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर विविध उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी रविवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी संगमनेर येथे टंचाई आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील तसेच संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार अमोल खताळ पाटील





यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक होणार आहे.

संगमनेर तालुक्यातील पाणीटंचाई, उपलब्ध पाणीसाठा, ग्रामीण भागातील पाणीपुरवठा व्यवस्था, टंचाईग्रस्त गावांना आवश्यक उपाययोजना तसेच नागरिकांच्या पाणीविषयक अडचणी याबाबत बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे टंचाईच्या परिस्थितीत प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या उपाययोजनांकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. ही बैठक रविवार, दि. ४ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता मालपाणी लॉन्स, संगमनेर येथे आयोजित करण्यात आली आहे.

टंचाईच्या प्रश्नावर स्थानिक पातळीवरील अडचणी व नागरिकांच्या समस्या मांडण्यासाठी बैठकीला महत्त्व प्राप्त झाले असून, महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिपकेसह सीजेपीच्या ५०० जणांवर गुन्हा दाखल

कॉक्रोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके यांना मोठा हादरा बसला आहे. दिपकेंना छत्रपती शिवाजी पार्कात आंदोलन घेणे महागात पडलं आहे. शिवाजी पार्कात परवानगी नसताना आंदोलन केल्याप्रकरणी अभिजीत दिपके यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिपके यांच्यासह कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलकांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून गुन्हा दाखल झाल्याने दिपकेंच्या अडचणीत वाढ झाल्याचे बोलले जात आहे.कॉक्रोच जनता पार्टीने मुंबईच्या शिवाजी पार्कात आंदोलन केलं. या आंदोलनासाठी देशभरातील तरुण शिवाजी पार्क परिसरात जमले होते. या आंदोलनाला सेलिब्रिटींनी देखील हजेरी लावली. सीजेपीच्या आंदोलनाला छत्रपती शिवाजी पार्कातील स्थानिकांचा विरोध होता. स्थानिकांच्या विरोधाला न जुमानता कॉक्रोच जनता पार्टीने छत्रपती शिवाजी पार्काजवळ आंदोलन करण्यावर ठाम होते. विरोध करणारे स्थानिक नसून भाजप पदाधिकारी असल्याचाही आरोप दिपकेंनी केला होता.

# गुणवंत विद्यार्थ्यांना सरकारचा आर्थिक आधार !

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक आधार मिळावा, यासाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) परीक्षा घेण्यात येणार आहे. इयत्ता आठवीत शिकणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांना या परीक्षेतून शिष्यवृत्ती मिळविण्याची संधी असून, इयत्ता नववी ते बारावीपर्यंत दरमहा १ हजार रुपये म्हणजेच वर्षाला १२ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. त्यामुळे चार वर्षांत विद्यार्थ्यांना एकूण ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत मिळू शकते.

या परीक्षेसाठी नियमित शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत ७ ऑक्टोबरपर्यंत आहे. त्यानंतर विलंब शुल्कासह अर्ज करता येणार आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावरून शाळांना ऑनलाइन आवेदनपत्र उपलब्ध करून देण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी संबंधित शाळेमार्फत अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी.

एनएमएमएस परीक्षेत दोन चाचण्या घेतल्या जाणार आहेत. सकाळी १०.३० ते दुपारी १२ या वेळेत बौद्धिक क्षमता चाचणी, तर दुपारी १.३० ते ३ या वेळेत शालेय क्षमता चाचणी होईल. दोन्ही चाचण्या प्रत्येकी ९० गुणांच्या असून, प्रत्येक पेपरमध्ये ९० प्रश्न असतील. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील विविध परीक्षा केंद्रांवर २० डिसेंबर रोजी ही परीक्षा घेण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील शासनमान्य, अनुदानित अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळेत इयत्ता आठवीत नियमित शिक्षण घेणारा विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र आहे. विद्यार्थ्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न ३ लाख ५० हजार रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच इयत्ता सातवीमध्ये खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्याला किमान ५५ टक्के, तर अनुसूचित जाती-जमातीतील विद्यार्थ्याला किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे.

नियमित शुल्कासह ७ ऑक्टोबरपर्यंत १२० रुपये शुल्क आकारले जाणार आहे. त्यानंतर ८ ते १४ ऑक्टोबरदरम्यान विलंब शुल्कासह २४० रुपये शुल्क भरावे लागेल. शाळा संस्थेच्या पातळीवरील विलंब असल्यास २१ ऑक्टोबरपर्यंत ४८० रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

एनएमएमएस परीक्षेचे ऑनलाइन आवेदनपत्र शाळांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांच्या माहितीमध्ये काही चूक झाल्यास संबंधित शाळेच्या लॉगिनमधून आवश्यक दुरुस्ती करता येणार आहे. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांनी अर्जातील नाव, जन्मतारीख, प्रवर्ग, गुण तसेच उत्पन्नाची माहिती काळजीपूर्वक तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाला आर्थिक हातभार**

**आर्थिक परिस्थितीमुळे गुणवंत विद्यार्थ्यांचे शिक्षण अडचणीत येऊ नये आणि त्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी, या उद्देशाने केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ही परीक्षा घेतली जाते. त्यामुळे पात्र विद्यार्थ्यांनी ही संधी गमावू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# पंतप्रधान मोदी नोव्हेंबरमध्ये पवारांच्या बारामतीत

बारामती - येत्या ३ नोव्हेंबर रोजी बारामतीमध्ये एका भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमासाठी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी बारामतीत येणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत ही मोठी माहिती दिली. बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या कॅम्पसमध्ये उभारण्यात आलेल्या गौतम बुद्धांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण या दिवशी करण्यात येणार आहे.

शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत माहिती देताना सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी ३ नोव्हेंबरला सकाळी १० वाजता बारामती विमानतळावर उतरतील. त्यानंतर तेथून ते थेट विद्या प्रतिष्ठानच्या कॅम्पसमध्ये आयोजित मुख्य कार्यक्रमासाठी उपस्थित राहतील.विद्या प्रतिष्ठानच्या कॅम्पसमध्ये गौतम बुद्धांचा एक अतिशय भव्य पुतळा उभारण्यात आला आहे. या पुतळ्याचे वजन तब्बल ४ टन असून, अशा आकाराचा आणि वैशिष्ट्यपूर्ण पोझमधील पुतळा इतरत्र कुठेही पाहायला मिळत नाही, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले. ज्या सभागृहात हा पुतळा बसवण्यात आला आहे, तिथे बुद्धांच्या विविध हस्तमुद्राही लावण्यात आल्या आहेत.

# दुष्काळाचा चौथा बळी! ६ दिवसांत विदर्भात ४ शेतकरी आत्महत्या

अकोला (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात दुष्काळाची दाहकता दिवसागणिक वाढत असतानाच वाढत्या तापमानाचा थेट परिणाम आता राज्यातील मोठ्या धरणांसह इतर जलसाठ्यावर होताना दिसत आहे. तर दुसरीकडे मोठ्या मेहनतीने उभी केलेली पिकं पावसाअभावी सुकून गेल्यानं बळीराजा मोठ्या अडचणीत सापडला आहे. दरम्यान, अकोला जिल्ह्यात दुष्काळ जाहीर झाल्यानंतर सहा दिवसात शेतकऱ्याची चौथी आत्महत्या झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सुकोडा गावातील २६ वर्षीय युवा शेतकरी संतोष नेमाडे यांनी आत्महत्या करत जीवन संपवलं आहे. गावालगतच्या विहिरीत उडी मारून केली युवा शेतकरी संतोष नेमाडे यांनी आत्महत्या करत जीवन संपवलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पाऊस न झाल्याने शेतातील परिस्थितीमूळे सुकोडा गावातील २६ वर्षीय युवा शेतकरी संतोष नेमाडे तणावात होते. गेल्या सहा दिवसातील जिल्ह्यातील शेतकऱ्याची ही चौथी आत्महत्या असल्याने सर्वत्र मोठी खळबळ उडाली आहे. याआधी बार्शीटाकळी तालुक्यातील सिंदखेड मोरेश्वर, मुर्तीजापुर तालुक्यातील गाजीपुर, आणि तेल्हारा तालुक्यातील खापरखेड येथील तीन शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत.

तर गेल्या सहा दिवसात पश्चिम विदर्भात आत्तापर्यंत जवळपास १५ पेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्याची माहिती आहे. त्यामुळे दुष्काळाची झळ दिवसागणिक वाढत असताना आता याच दुष्काळाचं भीषण वास्तव आता समोर आलं आहे.अशातच आता संपूर्ण गावकरी उपवास ठेवून शासनाचा निषेध नोंदवित आहे. शेतकऱ्यांना २०२०-२१ मधील गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचा विमा मंजूर होऊन देखील अद्यापपर्यंत विम्याची रक्कम मिळालेली नाही. गेल्या वर्षीचा पिक विमा एकाही शेतकऱ्याला मिळाला नाही. त्यामुळे सरकारने दुष्काळ जाहीर करणे सोबतच तात्काळ शेतकऱ्यांच्या खात्यात हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी धनंजय वानखेडे यांचे सह गावकऱ्यांनी केली आहे.

# नाणेघाटाचा शिलालेख ते ज्ञानेश्वरी

एखाद्या भाषेचा जन्म नेमका कोणत्या दिवशी झाला, हे सांगता येत नाही. नदीचा उगम एखाद्या झऱ्यात दिसतो; पण त्या झऱ्याच्या आधीही जमिनीच्या पोटात पाण्याचा प्रवास सुरू असतो. भाषेचेही तसेच आहे. आज आपण ज्या समृद्ध मराठी भाषेत बोलतो, लिहितो, साहित्यनिर्मिती करतो, त्या मराठीचा प्रवास समजून घ्यायचा असेल तर आपल्याला सुमारे दोन हजार वर्षे मागे जावे लागते-सह्याद्रीतील नाणेघाटापर्यंत!




जुन्नर परिसरातील नाणेघाट हा प्राचीन काळातील महत्त्वाचा व्यापारी मार्ग. कोकणातील बंदरे आणि दख्खनचा प्रदेश यांना जोडणाऱ्या या घाटात आजही सातवाहनकालीन गुहा आणि शिलालेख पाहायला मिळतात. यातील राणी नागनिकेशी संबंधित शिलालेख साधारण इ.स.पूर्व पहिल्या शतकातील मानला जातो. तो ब्राह्मी लिपीत आणि प्राकृत भाषेत कोरलेला आहे. हा शिलालेख मराठी भाषेत लिहिलेला आहे, असे म्हणणे ऐतिहासिकदृष्ट्या योग्य होणार नाही. परंतु मराठीच्या भाषिक पूर्वइतिहासाचा अभ्यास करताना त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. शिलालेखात सातवाहन राजा सातकर्णी, राणी नागनिका, राजघराणे, विविध वैदिक यज्ञ आणि त्यासाठी दिलेल्या दक्षिणांचा उल्लेख येतो. अश्वमेधासारख्या यज्ञांचाही त्यात निर्देश आहे. त्यामुळे हा शिलालेख केवळ भाषेचा पुरावा राहत नाही; तो तत्कालीन राजकीय, धार्मिक, आर्थिक आणि सामाजिक जीवनाचा दस्तऐवज बनतो.

**संस्कृतपासून प्राकृतकडे-** संस्कृत ही तत्कालीन प्रतिष्ठित धार्मिक व विद्वत् परंपरेची भाषा असताना शिलालेखासाठी प्राकृतचा वापर झालेला दिसतो. यावरून सामान्य व्यवहाराशी जवळीक असलेल्या प्राकृत भाषांना सार्वजनिक अभिव्यक्तीत महत्त्वाचे स्थान होते, हे लक्षात येते. संस्कृतमधील काही उच्चार प्राकृतमध्ये अधिक सोपे होत गेले. जोडाक्षरे सुटली, कठीण व्यंजनसमूह बदलले आणि शब्दांची रूपे लोकांच्या उच्चारांना जवळची झाली.

**उदाहरणार्थ-**

**अश्वमेध फअस्समेध**

**दक्षिणा फदखिणा**

**संकर्षण फसंकसण**

**शातकर्णि फसातकणि**

अशा रूपांकडे पाहताना भाषेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य लक्षात येते-भाषा पुस्तकात निर्माण होत नाही; ती माणसांच्या जिभेवर घडत असते.

**मग ही मराठी आहे का?**

नाही-नाणेघाटातील भाषा थेट आजची मराठी नाही. परंतु म्हणून तिचा मराठीशी संबंध नाही, असेही म्हणता येणार नाही. मराठी ही इंडो-आर्यन भाषांच्या दीर्घ विकासप्रक्रियेतून निर्माण झाली. प्राचीन प्राकृत भाषा, पुढील अपभ्रंशपरंपरा आणि मध्ययुगीन प्रादेशिक भाषारूपे यांच्या दीर्घ प्रवासातून मराठीचे स्वतंत्र स्वरूप अधिकाधिक स्पष्ट झाले.

म्हणून नाणेघाटाच्या शिलालेखाला ‘मराठीतील पहिला शिलालेख’ म्हणण्यापेक्षा ‘मराठीच्या भाषिक पूर्वइतिहासाचा अत्यंत प्राचीन आणि महत्त्वाचा पुरावा’ म्हणणे अधिक योग्य ठरेल.

**शिलालेखातून स्वतंत्र मराठीकडे-** शतकानुशतके भाषा बदलत राहिली. लोकांच्या बोलण्यातून नवे शब्द, नवी व्याकरणरूपे आणि नवे उच्चार तयार होत गेले. पुढील काळातील शिलालेख आणि ताम्रपटांमध्ये मराठीची स्वतंत्र वैशिष्ट्ये अधिक स्पष्टपणे दिसू लागतात. आणि मग तेराव्या शतकात मराठीच्या इतिहासात एक विलक्षण घटना घडली.

संत ज्ञानेश्वरांनी संस्कृतमधील भगवद्गीतेचे तत्त्वज्ञान सामान्य माणसाच्या भाषेत सांगण्याचा संकल्प केला. इ.स. १२९०च्या सुमारास रचलेली ‘भावार्थदीपिका’-ज्ञानेश्वरी मराठी भाषेच्या इतिहासातील एक महान टप्पा ठरली. नाणेघाटात जी लोकभाषेची प्राचीन पाऊलखूण शिळेवर दिसते, त्यानंतर सुमारे तेरा-चौदा शतकांनी ज्ञानेश्वरीत आपल्याला अत्यंत विकसित, प्रवाही, अर्थसमृद्ध आणि काव्यमय मराठीचे दर्शन घडते. ज्ञानेश्वरांनी मराठीचा केवळ वापर केला नाही; त्यांनी तिच्या अभिव्यक्तीच्या सामर्थ्याविषयी विलक्षण आत्मविश्वास व्यक्त केला. तत्त्वज्ञानासारखा गहन विषयही लोकांच्या भाषेत प्रभावीपणे सांगता येतो, हे त्यांनी सिद्ध केले.

**शिळेवरील अक्षरांपासून ओवीपर्यंत...** या संपूर्ण प्रवासाकडे पाहिले की एक सुंदर चित्र डोळ्यांसमोर उभे राहते.

नाणेघाटाच्या दगडी भिंतीवर ब्राह्मी अक्षरे कोरणारा कारागीर कदाचित कल्पनाही करू शकला नसेल की या प्रदेशातील भाषिक प्रवाह शेकडो वर्षांनंतर संतांच्या ओव्यांमधून एवढा समृद्ध होईल. **नाणेघाटात भाषा शिळेवर कोरली गेली; ज्ञानेश्वरीत ती ओवीतून जनमानसात झिरपली.**

नाणेघाटाचा लेख राजघराण्याचे यज्ञ, दान आणि तत्कालीन समाजव्यवहार सांगतो; ज्ञानेश्वरी माणसाच्या अंतर्मनाशी संवाद साधते. दोन्हींच्या काळात मोठे अंतर आहे. त्यांची भाषा एकच नाही. त्यांचे स्वरूपही एकसारखे नाही. तरीही महाराष्ट्राच्या भाषिक-सांस्कृतिक इतिहासाच्या दीर्घ प्रवासात हे दोन्ही टप्पे आपल्याला एका विशाल परिवर्तनाची जाणीव करून देतात. प्राकृतच्या प्राचीन प्रवाहातून, विविध अपभ्रंश व प्रादेशिक भाषारूपांच्या वाटेने मराठीने स्वतःचे स्वतंत्र रूप धारण केले आणि पुढे संत ज्ञानेश्वरांच्या प्रतिभेने तिला अभिजात साहित्यिक उंची प्राप्त झाली. म्हणून नाणेघाटातील झिजलेल्या अक्षरांकडे पाहताना आपण केवळ एका प्राचीन राजवंशाचा इतिहास वाचत नसतो. त्या अक्षरांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या भाषिक इतिहासाचे अतिप्राचीन दालन उघडत असतो. आणि ज्ञानेश्वरीची ओवी वाचताना त्या प्रदीर्घ प्रवासाचे एक समृद्ध रूप आपल्यासमोर येते. नाणेघाटाची शिळा आणि ज्ञानेश्वरांची ओवी यांच्यामध्ये शतकांचे अंतर आहे; पण त्या दोन टोकांच्या दरम्यान महाराष्ट्राच्या भाषेचा एक विलक्षण प्रवास दडलेला आहे-लोकांच्या मुखातून वाहत राहिलेला, काळाबरोबर बदलत गेलेला आणि अखेरीस ‘मराठी’ म्हणून स्वतंत्र अस्मिता प्राप्त केलेला प्रवास.

नाणेघाट फ प्राकृत फ अपभ्रंश फ प्रारंभीची मराठी फ मुकुंदराज फ महानुभाव साहित्य फ ज्ञानेश्वरी अशी कालरेषा जोडता येते

**संकलन–**
**मुकुंद वसुंधरा कृष्णराव डांगे**
**संगमनेर, मो. नं.**

# १७ वर्षांच्या कुमकुमचा सुवर्णवेध

## दक्षिण कोरियाला हरवत भारताला ऐतिहासिक सुवर्ण

अमरावतीची अग्रणी महिला धनुर्धर, १७ वर्षीय कुमकुम अनिल मोहोडने जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत शुक्रवार, २ रोजी रिकर्व्ह सांघिक प्रकारात १० वेळच्या ऑलिम्पिक विजेत्या दिग्गज दक्षिण कोरिया संघाला पराभूत करून भारताला पहिले ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकून दिले. ही तिची सर्वोत्तम कामगिरी आहे. जुने धनुष्य नव्हे, तर रिकर्व्ह धनुष्याचे जुनेच हँडल वापरून कुमकुमने आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णवेध केला. कारण तिला या जुन्या हँडलची चांगलीच सवय झाली होती.



यशदीप संजय भोगेने रिकर्व्ह सांघिक प्रकारात आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. या खेळाडूने अभ्यासात हुशार असतानाही खेळावरच लक्ष केंद्रित केले. दहावीत ८९ तसेच १२ वीत ८७ टक्के गुण असल्यामुळे थोरल्या भावाप्रमाणेच यशदीपनेही इंजिनिअरिंगला प्रवेश घ्यावा असे वडील संजय यांना वाटत होते. मात्र, त्याने खेळात करिअर केले.आशियाई तिरंदाजी स्पर्धेत कुमकुमने सुवर्ण जिंकले. कुमकुमचे वडील अनिल मोहोड यांनी दिलेली प्रतिक्रिया फारच बोलकी आहे. ते म्हणाले, पोरीने कमालच केली. अपेक्षेपेक्षाही मोठे यश मिळवले. त्यामुळे तिला शहरात सरावास जाण्या-येण्यासाठी मी इलेक्ट्रिक दुचाकी घेऊन देणार आहे. कारण, सध्या ती लहान आहे. दररोज मला तिला सकाळी व सायंकाळी सरावासाठी सोडायला जावे लागते. घ्यायलाही जावे लागते. बरे, इतर वाहनाने पाठवायचे म्हटले तर ५ हजारांवर खर्च येतो. तो झेपत नाही. त्यामुळे वडिलांनी तिच्यासोबत आशियाई स्पर्धेत पदक जिंकून दिल्यानंतर ई-बाइक घेऊन देण्याची शर्यत लावली होती. आता कुमकुमने पदक जिंकल्याने तिचे वडील तिला गाडी घेऊन देणार आहेत. तसेच, तिने २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकल्यास तिला मी नव्हे तर तिचे प्रशिक्षक आयफोन घेऊन देणार आहेत, असे वडिलांनी स्पष्ट केले. तिच्या पदकानंतर महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्रातून तिचे अभिनंदन होत आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# गांधीजींच्या सत्य आणि अहिंसेच्या विचारांतूनच मूल्याधिष्ठित समाज निर्मिती शक्य- डॉ. हनुमंत कुरकुटे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : गांधीजींच्या विचारविश्वाचा केंद्रबिंदू असलेले सत्य आणि अहिंसा ही केवळ दोन तत्त्वे नसून व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या जीवनाला दिशा देणारी जीवनमूल्ये आहेत, असे मत डॉ. हनुमंत कुरकुटे यांनी व्यक्त केले. राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त संगमनेर महाविद्यालयाच्या वतीने गुगल मीटच्या माध्यमातून ऑनलाइन आभासी मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड होते. पुढे बोलताना डॉ. हनुमंत कुरकुटे यांनी आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही गांधीजींच्या सत्य अहिंसा आणि नीतिमूल्यांची उपयुक्तता कायम असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

गांधीजींच्या विचारांमध्ये नीतिमूल्यांना असलेले महत्त्व, त्यांच्या आचरणातील पारदर्शकता आणि साधनशुचितेचा विचार स्पष्ट करताना डॉ. कुरकुटे यांनी विद्यार्थ्यांनी केवळ यश मिळविण्याचा विचार न करता ते मिळविण्यासाठी वापरले जाणारे मार्गही नैतिक असावेत, असा संदेश दिला. साध्याबरोबर साधनांची शुद्धताही महत्त्वाची आहे, हा गांधीवादी विचार आजच्या पिढीसाठी विशेष मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी गांधीजींच्या 'श्रमप्रतिष्ठा' या विचारावरही विशेष प्रकाश टाकला. कोणतेही काम लहान किंवा मोठे नसते, श्रमाला प्रतिष्ठा देणे ही सामाजिक समतेची महत्त्वाची पायरी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच गांधीजींच्या 'अंत्योदय' संकल्पनेचा अर्थ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचविणे हा असल्याचे सांगत सामाजिक न्याय, समता आणि सर्वसमावेशक विकासासाठी या विचाराची आजही आवश्यकता असल्याचे त्यांनी नमूद केले. गांधीजींच्या विचारांचा केवळ इतिहास म्हणून अभ्यास न करता दैनंदिन जीवनात त्यांचे आचरण करण्याची गरज असल्याचे डॉ. कुरकुटे यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी सत्याचा आग्रह, अहिंसेचा स्वीकार, श्रमाचा सन्मान आणि दुर्बल घटकांविषयी संवेदनशीलता या मूल्यांचा अंगीकार केल्यास अधिक जबाबदार नागरिकत्वाची निर्मिती होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.त्यांच्या विचारांचे स्मरण केवळ जयंतीपुरते मर्यादित न ठेवता ते आपल्या आचार-विचारांत उतरविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असा संदेश डॉ. हनुमंत कुरकुटे यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड यांनी आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनात महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. गांधीजींची साधी राहणी आणि उच्च विचारसरणी ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण ओळख होती. साधेपणा हा केवळ जीवनशैलीचा भाग नसून तो माणसाच्या विचारांतील प्रामाणिकपणा आणि आत्मशिस्तीशी जोडलेला असतो, असे त्यांनी सांगितले. गांधीजींच्या चारित्र्यनिर्मितीच्या विचारावर भाष्य करताना प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी व्यक्तीचे खरे सामर्थ्य केवळ ज्ञान किंवा संपत्तीत नसून त्याच्या चारित्र्यात आणि मूल्याधिष्ठित आचरणात असते, असे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबतच प्रामाणिकपणा, शिस्त, संयम, सामाजिक बांधिलकी आणि नैतिकता या गुणांचा विकास करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले, तसेच शांतता आणि सत्याग्रह या गांधीजींच्या विचारांचा संदर्भ देत संघर्ष सोडविण्यासाठी हिंसा हा अंतिम मार्ग नसून सत्य, संयम, संवाद आणि नैतिक धैर्य यांच्या माध्यमातूनही परिवर्तन घडवून आणता येते, हा गांधीवादी विचार त्यांनी स्पष्ट केला. सत्याग्रह हा केवळ आंदोलनाचा मार्ग नसून अन्यायाविरुद्ध सत्याच्या आणि नैतिक शक्तीच्या आधारावर उभे राहण्याची भूमिका आहे, असे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड यांनी प्रतिपादन केले. प्राचार्य डॉ. गायकवाड यांनी गांधीजींच्या पर्यावरणविषयक विचारांकडेही विद्यार्थ्यांचे लक्ष वेधले. निसर्गाचा अमर्याद उपभोग न घेता आवश्यकतेनुसार संसाधनांचा वापर करणे, साधेपणा स्वीकारणे आणि पर्यावरणाशी समतोल राखणे हा गांधीवादी जीवनदृष्टिकोन आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याचा उल्लेख करताना दोन्ही महान व्यक्तिमत्त्वांनी साधेपणा, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, स्वावलंबन आणि राष्ट्रसेवा यांना महत्त्व दिले.

तसेच साईबाबा सभागृह येथे महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अरुण गायकवाड यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या जवळपास १३० स्वयंसेवकांच्या उपस्थितीत राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. वसंत खरात, डॉ. रोशन भगत, डॉ. राजेश्वरी ओझा इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

# दुष्काळ निवारणासाठी गावनिहाय कृती आराखडा तयार करा - ना. राधाकृष्ण विखे

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणी, चारा आणि शेतीच्या नुकसानीबाबत प्रशासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात. गावपातळीवर टँकरचे नियोजन करताना लोकप्रतिनिधींची मते जाणून घेऊन गावनिहाय आराखडा तयार करावा. तसेच पात्र शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही, यासाठी शेतीच्या नुकसानीचे पंचनामे विहित वेळेत पूर्ण करावेत, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांनी दिले.



श्रीगोंदा मतदारसंघातील दुष्काळसदृश्य परिस्थिती तसेच चारा व पाणीटंचाईबाबत पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली श्रीगोंदा येथे आढावा बैठक झाली. आमदार विक्रम पाचपुते, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व स्थानिक पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी ग्रामीण भागातील गरजू गावांचा प्रत्यक्ष आढावा घेऊन टँकरचे वेळापत्रक निश्चित करावे. पाणीपुरवठा सुरळीत राहील याची जबाबदारी संबंधित यंत्रणांनी घ्यावी. तहसीलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी आणि पशुसंवर्धन अधिकारी यांनी तालुक्याचा एकत्रित अभ्यास करून उपलब्ध पाणीसाठा व भविष्यातील गरज लक्षात घेऊन नियोजन करावे. महाराष्ट्र जल प्राधिकरणांतर्गत सुरू असलेली पाणीपुरवठ्याची कामेही गतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

दुष्काळात पशुधनाचे संरक्षणही महत्त्वाचे असल्याने गावनिहाय पशुधनाची संख्या विचारात घेऊन चाऱ्याची गरज निश्चित करावी. गाय, शेळी, मेंढी आणि अन्य पशुधनासाठी आवश्यक चाऱ्याचे सूक्ष्म नियोजन करून त्याची उपलब्धता व वितरण यावर कृषी आणि पशुसंवर्धन विभागाने संयुक्तपणे लक्ष ठेवावे. शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करताना कोणताही पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. दुष्काळाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगत मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला असून त्यांच्या समस्या जाणून घेतल्याचे डॉ. विखे पाटील यांनी नमूद केले. शेतकऱ्यांना अखंडित वीजपुरवठा मिळावा यासाठी महावितरणने सतर्क राहावे. सौर ऊर्जेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे. ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी रोजगार हमी योजनेच्या कामांची व्याप्ती वाढवून अधिकाधिक कामे सुरू करावीत असे निर्देशही दिले.

# एका क्लिकवर रुग्णवाहिका! महाराष्ट्रात नवी डिजिटल सेवा

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णवाहिका मिळवणे आता कॅब बुक करण्याइतके सोपे होणार आहे. राज्य परिवहन आणि आरोग्य विभागाकडून एका नाविन्यपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्मवर काम सुरू असून, याद्वारे नागरिक मोबाईल प किंवा वेबसाइटच्या माध्यमातून आपल्या सर्वात जवळ उपलब्ध असलेली रुग्णवाहिका सहज शोधू आणि बुक करू शकतील.रस्ते अपघाताच्या वेळी वेळेवर मदत न मिळाल्यामुळे अनेकदा जीव गमावावा लागतो. या समस्येवर मात करण्यासाठी ही यंत्रणा अपघातानंतरचा पहिला तास म्हणजेच 'गोल्डन अवर' लक्षात घेऊन विकसित केली जात आहे. वेळेवर वैद्यकीय मदत मिळाल्यास रुग्णाच्या जगण्याची शक्यता कैक पटीने वाढते. सध्या नागरिकांना आपत्कालीन मदतीसाठी विविध हेल्पलाइन किंवा वैयक्तिक चालकांवर अवलंबून राहावे लागते. मात्र, या नव्या डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे सर्व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होऊन वारंवार फोन करण्याची कटकट संपणार आहे. तसेच प्रवासादरम्यान रुग्णाला प्राथमिक उपचारांची सुविधा मिळावी, यासाठी डॉक्टर व परिचारिकांच्या उपलब्धतेवरही विचार सुरू आहे.



# माय मराठीचा अभिजात गौरव आणि आपली भाषिक जबाबदारी



३ ऑक्टोबर २०२४ हा दिवस मराठी भाषेच्या इतिहासातील एक सुवर्णाक्षरांनी लिहावा असा दिवस ठरला. केंद्र सरकारने मराठी भाषेला अधिकृतपणे 'अभिजात भाषेचा दर्जा' जाहीर केला आणि तमाम मराठी माणसांच्या आनंदाला व अभिमानाला पारावार उरला नाही. मराठी भाषेचा हा ऐतिहासिक गौरव म्हणूनच ३ ऑक्टोबर हा 'मराठी अभिजात भाषा दिन' म्हणून साजरा केला जातो.

मात्र मराठी भाषेशी संबंधित महत्त्वाचे दिवस आपण लक्षात ठेवले पाहिजेत. २७ फेब्रुवारी रोजी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. तर १ मे रोजी मराठी राजभाषा दिन साजरा केला जातो. या तीनही दिवसांचे महत्त्व वेगवेगळे असून, ते मराठीच्या गौरवाची वेगवेगळी पर्वे आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी अनेक थोर साहित्यिक, संशोधक आणि अभ्यासकांनी अथक परिश्रम घेतले. आपल्या संगमनेरचे, संगमनेर महाविद्यालयातील आदरणीय प्रा. रंगनाथ पठारे हे मराठीच्या अभिजात दर्जासाठी कार्यरत समितीचे अध्यक्ष होते. त्यांनीही या ऐतिहासिक कामासाठी मोठे योगदान दिले. त्यामुळे संगमनेरसाठीही हा अभिमानाचा क्षण आहे.

आद्यकवी मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरू संत तुकाराम महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत रामदास स्वामी, भक्तशिरोमणी निळोबाराय अशा संत-महात्म्यांनी मराठी भाषेला समृद्ध केले. वारकरी संप्रदायाचा मराठीच्या जतन आणि संवर्धनात मोठा वाटा आहे. भजन, भारूड, कीर्तन, प्रवचन अशा विविध माध्यमांतून वारकरी संतांनी मराठीला जनमानसात जिवंत ठेवले.

मराठी ही केवळ संवादाची भाषा नाही; ती आपल्या जगण्याची भाषा आहे. मराठीत बोला, मराठीत वाचा, मराठीत लिहा; मराठीत हसा, मराठीत रडा, मराठीत भांडा आणि मराठीत जगा- आपल्या जीवनातील प्रत्येक व्यवहारात मराठीचा अभिमानाने वापर झाला पाहिजे.

कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांनी म्हटले होते, मला मराठी भाषेचा अभिमान आहे; परंतु दुराभिमान नाही. मराठीला मिळालेला अभिजात दर्जा हा कोणत्याही भाषेविरुद्धचा भाव नसून आपल्या मायभाषेचा गौरव आहे. मराठी साहित्याचे अंतिम फलित हे 'सत्यम्, शिवम्, सुंदरम्' या मूल्यांमध्येच सामावलेले आहे.

कुसुमाग्रज साहित्याच्या निर्मितीची तुलना नदीच्या उगमाशी करतात. नदी उगमापाशी थांबत नाही; ती प्रवास करीत समाजजीवनात प्रवेश करते. त्याचप्रमाणे साहित्यही केवळ लेखकाच्या आत्मविष्कारापुरते मर्यादित राहत नाही. ते लोकजीवनात प्रवेश करते आणि एका व्यक्तीचे अनुभव अनेकांचे होतात. आत्मविष्काराचे रूपांतर सामाजिक संवादात होणे, हीच साहित्यसाधनेची सार्थकता आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठीची सांस्कृतिक आणि साहित्यिक समृद्धी राष्ट्रीय पातळीवर अधिक ठळकपणे अधोरेखित होण्याची संधी निर्माण झाली आहे. या दर्जामुळे मराठी भाषेतील संशोधन, प्राचीन ग्रंथांचे जतन, साहित्यनिर्मिती, शैक्षणिक अभ्यासक्रम आणि भाषाविकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या सहाय्याचा उपयोग मराठीच्या संवर्धनासाठी प्रभावीपणे झाला पाहिजे.

अभिजात दर्जा मिळणे हा शेवट नसून एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. भाषिक स्वाभिमानासोबत भाषा संरक्षणाची जबाबदारीही आपलीच आहे. मराठीचा प्राचीन वारसा जपणे, जुने ग्रंथ सुरक्षित ठेवणे, नव्या पिढीला मराठी साहित्याची ओळख करून देणे आणि दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढवणे आवश्यक आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला याचा आनंद आपण साजरा करतो; पण या दर्जाचा अर्थ नव्या पिढीला समजावून सांगणे त्याहून महत्त्वाचे आहे. त्यासाठी वाचनसंस्कृती वाढवणे गरजेचे आहे. मराठी साहित्यात हजारो पुस्तके वाचण्यासारखी आहेत. दररोज एक पुस्तक वाचणे शक्य नसेल, तर त्या पुस्तकाची काही पाने तरी वाचली पाहिजेत. केवळ मुलांनी किंवा विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचावीत, असे सांगून वाचनसंस्कृती निर्माण होणार नाही. शिक्षक आणि पालकांनी स्वतः पुस्तक वाचायला सुरुवात केली, तर मुलेही वाचनाकडे वळतील. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'ग्रंथ हेच गुरु' असे सांगत पुस्तकांशी मैत्री करण्याचा संदेश दिला. आजच्या डिजिटल युगात हा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी काही महत्त्वाचे निकष निश्चित करण्यात आले होते. भाषेला दीर्घ आणि प्राचीन इतिहास असणे, साधारण १५०० ते २००० वर्षांची परंपरा असणे, समृद्ध साहित्यपरंपरा व प्राचीन ग्रंथसंपदा असणे तसेच भाषेची स्वतंत्र आणि स्वयंभू परंपरा असणे, हे त्यातील महत्त्वाचे निकष होते. या निकषांची पूर्तता मराठी भाषेने केली, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. मात्र अभिजात भाषेचा दर्जा मिळाला म्हणून आपली जबाबदारी संपत नाही. उलट ती अधिक वाढली आहे. आपली मायबोली व्यवहारात किती वापरली जाते, यावर तिचे भवितव्य अवलंबून आहे. आज अनेक ठिकाणी, विशेषतः बँका आणि विविध कार्यालयांमध्ये हिंदी अथवा इतर भाषिक कर्मचारी असतात. आपणही त्यांच्याशी सहजपणे हिंदीत संवाद साधतो. मात्र शक्य असेल तेथे आपण मराठीतच संवाद साधला पाहिजे. आपणच आपल्या भाषेचा वापर केला नाही, तर इतरांनी मराठीचा वापर करावा, अशी अपेक्षा कशी ठेवणार? मराठी ही अमृताशी पैजा जिंकणारी भाषा आहे. तिच्या अंगाखांद्यावर खेळत आपण मोठे झालो आहोत. तिच्या शब्दांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, तिच्या साहित्याने आपले जीवन समृद्ध केले आणि तिच्या संस्कृतीने आपली ओळख घडवली. म्हणूनच मराठीच्या अभिजात दर्जाचा केवळ उत्सव न करता मराठी वाचूया, मराठी लिहूया, मराठीत संवाद साधूया आणि मराठी जगूया.

हीच आपल्या मायमराठीला खरी आदरांजली ठरेल.

जय मराठी! जय मायबोली!

**– प्रा. शशांक गंधे**
**मो. ९८९०१६३६४२**

# राजापूरची मानसी हासे नीट परीक्षेत तालुक्यात प्रथम

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील राजापूर येथील कु. मानसी तुळशीराम हासे हिने अभ्यासात सातत्य ठेवत तसेच कोणत्याही परिस्थितीत डॉक्टर व्हायचंच ही जिद्द मनाशी बाळगून वैद्यकीय प्रवेश पात्रतेसाठी असलेल्या नीट परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला असून तिची नासिक येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस या अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.



पुणे येथे भारतीय सैन्य दलामध्ये सुभेदार या पदावर कार्यरत असणारे तुळशीराम हासे यांची कन्या मानसी हिने लहानपणापासून कोणत्याही परिस्थितीत डॉक्टर होऊन गोरगरीब समाजाची सेवा करायची हे स्वप्न मनाशी बाळगून बारावीचे विज्ञान शाखेचे शिक्षण पूर्ण केले तिने वैद्यकीय प्रवेश पात्रतेसाठी आवश्यक असलेली नीट परीक्षा दिली या नीट परीक्षेतील ऑल इंडिया रँकमध्ये खुल्या गटातून ९७ हजार ७१५ वा क्रमांक पटकावत संगमनेर तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला मानसी हिच्या यशाचे कौतुक करत आमदार अमोल खताळ यांनी तिचा सन्मान केला निवडीबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# संगमनेर महाविद्यालयाचा युवा महोत्सवात डंका



युवावार्ता (प्रतिनिधी) : संगमनेर - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने संगमनेर महाविद्यालयात आयोजित अहिल्यानगर जिल्हास्तरीय युवक महोत्सव 'जल्लोष-२०२६' मध्ये संगमनेर महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. महाविद्यालयाच्या नाट्य विभागाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले असून, विविध १० कलाप्रकारांमध्ये विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय युवक महोत्सवासाठी निवड झाली आहे.

युवक महोत्सवात तब्बल २८ विविध कलाप्रकारांचा समावेश होता. त्यामध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी एकांकिका, प्रहसन, मूकनाट्य, पथनाट्य आणि मिमिक्री या प्रकारांत विशेष प्राविण्य मिळवत सांघिक व वैयक्तिक पारितोषिके पटकावली. याशिवाय शास्त्रीय व सुगम गायन, शास्त्रीय व समूह नृत्य, बासरी वादन, पोस्टर मेकिंग, रांगोळी, वक्तृत्व, वादविवाद, प्रश्नमंजुषा आणि स्पॉट फोटोग्राफी अशा विविध स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय सहभाग नोंदविला. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सुरेश गुडदे, समन्वयक डॉ. बाळासाहेब पालवे, डॉ. राजेश्वरी सारस्वत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे यश मिळविले. विद्यार्थ्यांच्या यशासाठी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही परिश्रम घेतले. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य प्रो. डॉ.अरुण गायकवाड, उपप्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## संपादकीय...

# ऑनलाइन जग वाढले ऑफलाइन संवाद हरवला

एकेकाळी माणसांच्या भेटीगाठी म्हणजे नात्यांना उब देणारा क्षण असायचा. घराच्या अंगणात बसून गप्पा रंगायच्या, शेजाऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे सहज घडायचे, मित्रांच्या भेटीत वेळेचे भान राहत नसे. आज मात्र तंत्रज्ञानाने जग जवळ आणले आहे. मोबाईलच्या एका क्लिकवर हजारो लोकांशी संपर्क साधता येतो. सोशल मीडियावर मित्रांची संख्या वाढते, व्हॉट्सपवर संदेशांची देवाणघेवाण होते, व्हिडीओ कॉलमुळे हजारो किलोमीटर अंतर क्षणात मिटते. तरीही या सगळ्या संपर्काच्या गर्दीत मनापासून संवाद साधणारी माणसे मात्र कमी होत चालली आहेत. ही विसंगती आजच्या समाजासमोरील गंभीर प्रश्न आहे. आज प्रत्येकाच्या हातात स्मार्टफोन आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मोबाईल आपल्या सोबत असतो. कुटुंबातील चार माणसे एकाच खोलीत बसलेली असतात; पण प्रत्येकाचे लक्ष वेगवेगळ्या स्क्रीनवर असते. आई-वडील मुलांशी बोलण्याचा प्रयत्न करतात, तर मुलांच्या कानात हेडफोन असतात. पती-पत्नी समोरासमोर बसलेले असतात; पण संवाद मेसेजवर सुरू असतो. मित्रांची भेट होते; मात्र गप्पांपेक्षा फोटो काढणे, स्टेटस ठेवणे आणि सोशल मीडिया पाहणे याला अधिक महत्त्व मिळते. आपण एकमेकांच्या 'ऑनलाइन' आयुष्याशी जोडले गेलो आहोत; पण 'मनाशी' जोडले जाणे कुठेतरी मागे पडले आहे. संवाद म्हणजे केवळ बोलणे नव्हे. संवाद म्हणजे समोरच्याचे बोलणे ऐकणे, त्याच्या भावनांना समजून घेणे, त्याच्या आनंदात आनंदी होणे आणि दुःखाच्या वेळी त्याच्या पाठीशी उभे राहणे. आज माहितीची देवाणघेवाण प्रचंड वाढली आहे; मात्र भावनांची देवाणघेवाण कमी झाली आहे. 'काय चाललंय?' हा प्रश्न विचारला जातो; पण त्याचे उत्तर खरोखर जाणून घेण्यासाठी वेळ दिला जात नाही. 'मी ठीक आहे' एवढे उत्तर मिळाले की आपणही समाधान मानतो. समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरचे दुःख, आवाजातील बदल किंवा मनातील अस्वस्थता ओळखण्यासाठी लागणारा वेळ आणि संयम मात्र आपल्याकडे उरलेला नाही. या संवादाच्या अभावाचा सर्वाधिक परिणाम कुटुंबव्यवस्थेवर होत आहे. पूर्वी घरातील ज्येष्ठ व्यक्तींच्या अनुभवातून पुढची पिढी शिकायची. आजी-आजोबांच्या गोष्टी, आई-वडिलांचे अनुभव, भावंडांमधील चर्चा यामुळे घरातील नाती घट्ट होत. आता अनेक घरांमध्ये प्रत्येक व्यक्तीची दिनचर्या वेगळी झाली आहे. जेवणाच्या टेबलावरही मोबाईल असतो. घरातील सदस्य दिवसभर काय अनुभवून आले, त्यांच्या मनात काय आहे, याची साधी विचारपूस करण्यासाठीही वेळ मिळत नाही. परिणामी एकाच छताखाली राहूनही माणसे भावनिकदृष्ट्या दूर जाऊ लागली आहेत. याचा परिणाम मुलांवरही मोठ्या प्रमाणात होत आहे. मुलांना महागडी साधने, चांगल्या शाळा आणि सुविधा देणे आवश्यक आहे; परंतु त्याहून महत्त्वाचे आहे पालकांचा वेळ आणि संवाद. मुलांच्या गुणांपेक्षा त्यांच्या मनात काय चालले आहे, त्यांना कोणत्या गोष्टीची भीती वाटते, कोणती स्वप्ने आहेत, कोणत्या अडचणी आहेत, हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. संवादाचा अभाव राहिला तर मुलांच्या समस्या पालकांपर्यंत पोहोचण्याआधीच त्या मोठ्या होऊ शकतात. सोशल मीडिया स्वतःमध्ये वाईट नाही. उलट त्याने माहिती, शिक्षण, व्यवसाय आणि संपर्काच्या अनेक नव्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. प्रश्न तंत्रज्ञानाचा नसून त्याच्या वापराच्या पद्धतीचा आहे. तंत्रज्ञानाने माणसांना जोडायला हवे; माणसांमधील अंतर वाढवायला नव्हे. मोबाईलचा वापर आपण संवादासाठी करतोय की संवाद टाळण्यासाठी, हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. आज समाजात मानसिक ताण, एकटेपणा आणि असुरक्षिततेची भावना वाढताना दिसते. अशा परिस्थितीत औषधांपेक्षा, सल्ल्यांपेक्षा आणि अनेकदा पैशांपेक्षाही एखाद्या जवळच्या व्यक्तीने शांतपणे ऐकून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. 'तू माझ्यासाठी महत्त्वाचा आहेस' हा संदेश शब्दांतून आणि कृतीतून मिळणे हीच खरी भावनिक सुरक्षितता आहे. म्हणूनच आता संपर्काच्या संख्येपेक्षा संवादाची गुणवत्ता महत्त्वाची ठरली पाहिजे. दिवसातून काही वेळ मोबाईल बाजूला ठेवून कुटुंबासोबत बसणे, ज्येष्ठांशी बोलणे, मुलांचे म्हणणे शांतपणे ऐकणे, मित्रांची प्रत्यक्ष भेट घेणे आणि शेजाऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, या छोट्या गोष्टी समाजातील नाती पुन्हा जिवंत करू शकतात. आपल्या फोनमध्ये हजारो संपर्क असतील; पण मन मोकळे करून बोलता येतील अशी माणसे किती आहेत? हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. कारण तंत्रज्ञान आपल्याला जगाशी जोडू शकते; पण माणसाला माणसाशी जोडण्याचे काम आजही संवादच करतो. संपर्क वाढत राहतील, तंत्रज्ञान अधिक प्रगत होत राहील, जग आणखी जवळ येईल; पण त्या प्रवासात माणसामाणसांतील आपुलकी हरवू नये.

# आदिवासी विकास विभाग कर्मचारी पतसंस्थेचा गुणवंत पाल्य गुणगौरव समारंभ उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

- आदिवासी विकास विभाग शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर, राजूर यांच्या वतीने गुणवंत पाल्य गुणगौरव समारंभ उत्साहात नुकताच पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब दादू पटेकर होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुशील बेनके उपस्थित होते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना डॉ. सुशील बेनके यांनी बदलत्या काळातील रोजगाराच्या नवीन संधी, विविध करिअरच्या वाटा, विद्यार्थ्यांसमोरील भविष्यातील आव्हाने तसेच उपलब्ध शिष्यवृत्ती योजनांबाबत डॉ. बेनके यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात भाऊसाहेब दादू पटेकर यांनी विद्यार्थी दशेत शिस्त, सातत्य आणि नियमित अभ्यासाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून मेहनत घ्यावी आणि भविष्यात जबाबदार नागरिक म्हणून समाजासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता सभासद व त्यांच्या कुटुंबांच्या गरजा लक्षात घेऊन विविध उपक्रम राबवत असल्याचे करवर यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे ज्येष्ठ संचालक व माजी चेअरमन गंगाराम करवर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सभासद धनंजय सोनटक्के यांनी केले, तर आभार प्रदर्शन अविनाश बनसोडे यांनी केले.

कार्यक्रमास संस्थेचे संचालक चंदन बडवे, प्रमोद राऊत, पंडित कदम, रामनाथ उंबरकर, वैशाली कोंडार, छाया आदमाने, संस्थेचे सचिव काशिनाथ भोर, लिपिक शंकर सदगीर यांच्यासह सभासद, पालक, मुख्याध्यापक, गृहपाल व विद्यार्थी उपस्थित होते.

# दरेवाडी शाळेत शिक्षण परिषदेचा प्रेरणादायी उपक्रम



युवावार्ता (प्रतिनिधी)

इगतपुरी- भाम धरणाच्या कुशीत विलोभनीय निसर्गाने नटलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दरेवाडी येथे नुकतीच शिक्षण परिषद उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली. प्रतिकूल परिस्थिती, भौगोलिक दुर्गमता आणि मर्यादित संसाधने असूनही शाळा व्यवस्थापन व शिक्षकांच्या सुंदर समन्वयातून ही परिषद उपस्थितांसाठी विशेष प्रेरणादायी ठरली. प्रस्तुत परिषदेच्या सुरूवातीला शाळेतील विद्यार्थिनींनी पारंपारिक आदिवासी पेहरावात उपस्थितांचे औक्षण करून सहर्ष स्वागत केले. त्यानंतर मुख्याध्यापक संजय गातवे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांच्या सोबतीने हार्मोनियमवर तालबद्ध स्वागतगीत सादर केले. हे गीत ऐकून सर्वच मंत्रमुग्ध झाले. यानंतर सहशिक्षक महेश खैरनार यांनी आपल्या सुरमयी आवाजात शोधिसी मानवा हे ईशस्तवन गावून उपस्थितांची मने जिंकली.

शाळेच्या उपक्रमशील आयडॉल शिक्षिका श्रीमती वंदना सोनार यांनी आपल्या ओघवत्या शैलीत सादर केलेल्या प्रास्ताविकातून दरेवाडी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तापूर्ण वाटचालीच्या यशोगाथेची वास्तववादी मांडणी केली. प्रस्तुत परिषदेतील तज्ञ सुलभक जनार्दन केकरे यांनी क्षेत्र भेटीचे नियोजन व महत्त्व, कमलेशकुमार शिरोडे यांनी निपुण भारत अंतर्गत भाषा आकलनयुक्त वाचन, दत्तू साबळे यांनी गुणाकाराची सोपी तंत्रे, जितेंद्र भदाणे यांनी शाळा व्यवस्थापन समिती व लोकसहभागाचे महत्त्व या घटकांवर तांत्रिक कौशल्यांचा वापर करून अभ्यासपूर्ण शैक्षणिक सत्रे घेतली.

या संदर्भात भरवज शाळेचे मुख्याध्यापक दगडूसिंग परमार यांनी परिषदेसाठी स्मार्ट टीव्ही उपलब्ध करून महत्त्वपूर्ण सहकार्य केले. शेवटी परिषदेचे अध्यक्ष व काळुस्ते केंद्राचे केंद्र समन्वयक निशांत पगार यांनी प्रशासकीय विषयांचा सखोल आढावा घेतला. तसेच परिषदेचे आदर्शवत नियोजन केल्याबद्दल टीम दरेवाडीचे अभिनंदन केले. या दरम्यान दरेवाडी शाळेकडून उपस्थित गुरुजनांना सुरुची भोजन देण्यात आले. अतिशय खडतर परिस्थितीत समर्पित भावनेने ज्ञानदानाचे कार्य करणारे दरेवाडी शाळेतील शिक्षक संजय गातवे, महेश खैरनार व श्रीमती वंदना सोनार यांचा केंद्रातील शिक्षकांकडून विशेष गौरव करण्यात आला. मासिक परिषदेची सांगता सामुदायिक वंदे मातरम् गायनाने व जय दरेवाडी या घोषवाक्याने झाली. अशा प्रकारे अनेक अर्थांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरलेल्या शैक्षणिक परिषदेसाठी दरेवाडी शिक्षक चमूचे इगतपुरी पंचायत समितीचे गट शिक्षणाधिकारी बाळासाहेब मुंढे व शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती मंजुषा साळुंखे यांनी अभिनंदन करून कौतुक केले आहे.

# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त पुस्तक वाचन व श्रमदान




युवावार्ता (प्रतिनिधी)

नान्नज दुमाला - येथील श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती विविध कृतिशील उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे व शिक्षक प्रतिनिधी विलास गायकवाड यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनकार्याविषयी विद्यार्थ्यांना मौलिक माहिती देत त्यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. जयंतीनिमित्त विद्यालय परिसराची स्वच्छता, तणनाशक फवारणी तसेच श्रमदान करण्यात आले. याचबरोबर इयत्ता दहावीतील ईश्वरी चत्तर, प्रांजल गायकवाड, शालिनी फड व हर्षदा शेळके यांनी अनुक्रमे महात्मा गांधी, महात्मा बसवेश्वर, अहिल्याबाई होळकर व साने गुरुजी यांच्या चरित्र पुस्तकांचे वाचन केले. वाचलेल्या पुस्तकांच्या आशयावर विद्यार्थ्यांना प्रश्नावलीच्या माध्यमातून प्रश्न विचारण्यात आले.

तसेच महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती कशा प्रकारे साजरी करण्यात आली, याबाबत मराठी विषयांतर्गत विद्यार्थ्यांना वृत्तांत लेखनाचा उपक्रम देण्यात आला. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच इयत्ता दहावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून

## दूध भेसळीवर प्रशासनाची....

जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट असून चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्याचा परिणाम आगामी काळात दूध उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे दुधाची मागणी वाढल्यास दरात वाढ होण्याची शक्यता असून, अशा परिस्थितीत भेसळीचे प्रकार वाढण्याची शक्यता प्रशासनाने गांभीर्याने घेतली आहे. दूधभेसळीच्या प्रकरणात गुन्हे दाखल झाले तरी अनेकदा त्यांचा सखोल तपास न झाल्याने भेसळखोरांवर अपेक्षित परिणाम होत नसल्याची बाबही पुढे आली आहे. त्यामुळे आता ऑनलाइन नोंद, १८ निकषांवरील तपासणी आणि उत्पादक ते खरेदीदार संपूर्ण साखळीची पडताळणी यामुळे दूधभेसळीला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी दप्तर...

संबंधित विद्यार्थ्यांवर केवळ कारवाई करण्याऐवजी त्यांचे समुपदेशन करून पालक व शिक्षकांच्या माध्यमातून योग्य मार्गदर्शन करावे, असेही डॉ. कळमकर यांनी सुचविले आहे. विद्यार्थ्यांच्या वर्तनातील बदल, त्यांच्या संगतीतील बदल आणि दप्तरातील संशयास्पद वस्तू याकडे शिक्षक व पालकांनी संवेदनशीलतेने लक्ष देणे गरजेचे आहे. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था न राहता विद्यार्थ्यांच्या सुरक्षित आणि सुसंस्कारित भविष्यासाठी काम करणारी यंत्रणा बनली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

## पुणे-नाशिक रेल्वेसाठी...

संधींनाही चालना मिळण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली.

रेल्वे मार्ग हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नसून परिसराच्या भविष्यातील विकासाशी निगडित महत्त्वाचा विषय असल्याचे सांगत, शासनाने संगमनेर-अकोले मार्गाचा गांभीर्याने विचार करावा आणि या भागातील जनतेच्या मागणीचा सकारात्मक विचार करावा, अशी मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली.

देवगाव ग्रामस्थांच्या जागरण गोंधळ आंदोलनामुळे पुणे-नाशिक रेल्वे मार्गाचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला असून, शासन याबाबत कोणता निर्णय घेते, याकडे संगमनेर-अकोले परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta

पाहिजेत
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य)
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ अँण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

पाहिजेत
डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर
लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

20 गुंठे जागा भाडे तत्त्वावर देणे आहे
नूतन माध्यमिक विद्यालया पुढे, राजापूर, तालुका- संगमनेर. जिल्हा अहिल्यानगर.
7798616908

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

जागा भरणे आहे
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431







पाहिजेत
नॅशनल मेडीकल हॉस्पिटल ऑफ आयुर्वेदिक सायन्स
वेल्हाळे, ता. संगमनेर
पंचकर्म थेरापिस्ट
पुरूष-१/ स्त्री -१
आकर्षक पगार
9370071777
8806292948

पाहिजेत
दुकान कामासाठी होतकरू मुलगा पाहिजे - २ जागा
आकर्षक पगार
राजा ड्रेसेस
बाजारपेठ, ता. संगमनेर, जि. अ.नगर
8275191096

स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत
अकाऊंटंट मॅनेजर
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॅार्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084

# सुवर्ण पदक घेऊन अस्लम पोहोचला साईदरबारी




युवावार्ता (प्रतिनिधी)

जपानमध्ये २६ सप्टेंबर रोजी झालेल्या भारत आणि इराण यांच्यात रंगलेल्या एशियन गेम्स कबड्डी स्पर्धेच्या अत्यंत चुरशीच्या आणि थरारक सामन्यात भारतीय कबड्डी संघानं ऐतिहासिक विजय मिळवत देशासाठी सुवर्णपदक पटकावलं. या सुवर्णमयी कामगिरीत महत्त्वाची भूमिका बजावणारा महाराष्ट्राचा स्टार कबड्डीपटू आणि महाराष्ट्र कबड्डी संघाचा कर्णधार अस्लम इनामदारनं शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचं मनोभावं दर्शन घेतले.

देशासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळविल्या नंतरही आपल्या श्रद्धास्थानाला विसरु न देता अस्लमनं शिर्डी गाठल्यानं त्याच्या साईबाबांवरील श्रद्धेची प्रचिती आली. साईबाबांच्या समाधीसमोर नतमस्तक होत त्यानं आपल्या यशाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत यावेळी त्यानं एशियन गेम्समध्ये मिळविलेलं बहुमोल सुवर्णपदक काही काळ साईबाबांच्या चरणी ठेवत नतमस्तक झाला. साईबाबांच्या दर्शनानंतर एका वृत्तवाहिनीशी बोलताना अस्लमनं आपल्या १६ वर्षांच्या क्रीडा प्रवासातील संघर्ष, अडचणी, मेहनत, साईबाबांवरील श्रद्धा तसंच युवा खेळाडूंना दिलेला प्रेरणादायी संदेश याबाबत मनमोकळेपणानं भाष्य केले.

आपल्या क्रीडा कारकिर्दीत आतापर्यंत मिळविलेलं प्रत्येक पदक तो साईबाबांच्या चरणी अर्पण करण्यासाठी घेऊन येत असल्याचं अस्लमनं सांगितलं. अहिल्यानगर जिल्ह्यातील टाकळीभान हे त्याचं मूळ गाव असून तिथंही साईबाबांचं मोठं मंदिर आहे. लहानपणापासूनच साईबाबांवर त्याची अथांग श्रद्धा आहे. त्यामुळं मैदानावर मिळविलेल्या प्रत्येक यशानंतर साईचरणी नतमस्तक होणं हे त्याच्या आयुष्याचं अविभाज्य भाग बनलं आहे. एशियन गेम्समधील हे सुवर्णपदक अस्लमसाठी विशेष महत्त्वाचं आहे. भारतीय संघाचं प्रतिनिधित्व करत देशासाठी सुवर्णपदक मिळविणं हा अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण असल्याचं त्यानं सांगितलं. भविष्यातही देशासाठी आणखी अनेक आंतरराष्ट्रीय पदकं मिळविण्याचा निर्धार त्यानं व्यक्त केला.

# राजूर पोलिसांची दमदार कामगिरी

## दीड लाखांचा आयफोन काही तासांत शोधून पर्यटकाला केला परत



राजूर -भंडारदरा आणि हरिश्चंद्रगड परिसरात सोनकीच्या फुलांचा बहर आल्याने पर्यटकांची गर्दी वाढत आहे. अशातच पुण्याहून पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकाचा सुमारे दीड लाख रुपये किमतीचा आयफोन राजूर येथे हरवला. मात्र, राजूर पोलिसांनी तत्परता दाखवत तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने अवघ्या काही तासांत मोबाईल शोधून संबंधित पर्यटकाला परत केला. पोलिसांच्या या कामगिरीमुळे पर्यटकाच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलले.

याबाबत अधिक माहिती अशी की, शुक्रवारी सायंकाळी सातच्या सुमारास पुणे येथील शैलेश दीक्षित यांच्यासह पाच पर्यटक हरिश्चंद्रगड येथे ट्रेकिंगसाठी आले होते. या प्रवासादरम्यान दीक्षित यांचा महागडा आयफोन राजूर येथे हरवला. परिसरात शोध घेऊनही मोबाईल न मिळाल्याने त्यांनी याबाबत राजूर पोलीस ठाण्यात माहिती दिली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन राजूर पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार आणि पोलीस ठाणे अंमलदार गोंधे यांनी तातडीने शोधमोहीम सुरू केली. पोलीस हवालदार सचिन धनाड तसेच पोलीस अंमलदार राऊत आणि दत्ता परते यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईलचा शोध घेण्यास सुरुवात केली.

पोलिसांच्या तत्परतेमुळे राजूरपासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या साकिरवाडी येथे हरवलेला आयफोन मिळून आला. त्यानंतर हा मोबाईल तक्रारदार शैलेश दीक्षित यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. महागडा मोबाईल परत मिळाल्याने दीक्षित यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. तसेच, तातडीने दखल घेऊन काही तासांत मोबाईल शोधून दिल्याबद्दल त्यांनी राजूर पोलिसांचे आभार मानले.

हरवलेल्या वस्तूंचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि तांत्रिक कौशल्य यामुळे पर्यटकांना मोठा दिलासा मिळाला असून, राजूर पोलिसांच्या या कामगिरीचे कौतुक होत आहे.

# 'व्होट चोरी'वर राहुल गांधी आक्रमक

## ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची मागणी



नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशभरात महात्मा गांधी यांची जयंती साजरी केली जात असतानाच, दुसरीकडे मतदारांची नावे वगळणे आणि व्होटर लिस्टमध्ये कथित गैरव्यवहाराच्या विरोधात युवक व विरोधी पक्ष रस्त्यावर उतरले आहेत. या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि केंद्र सरकारवर गंभीर आरोप करत जोरदार हल्लाबोल केला आहे.

युवक व्होट चोरीविरोधात शांततेच्या मार्गाने, घटनात्मक अधिकारांचा वापर करत आंदोलन करत आहेत, मात्र तरीही त्यांच्यावर लाठीचार्ज केला जात आहे, अशा शब्दात राहुल गांधी यांनी संताप व्यक्त केला.राहुल गांधी म्हणाले की, आज गांधी जयंतीच्या दिवशी हजारो तरुण व्होट चोरीविरोधात रस्त्यावर उतरले आहेत. हे लोक कोणत्याही हिंसेशिवाय अत्यंत शांततेत आंदोलन करत आहेत. त्यांची मागणी स्पष्ट आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा, लोकशाही वाचवावी. पण यावर मोदी-शाह सरकारचे उत्तर काय? तरुण मुला-मुलींना रस्त्यावर ओढले जात आहे, शेकडो तरुणांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचा गुन्हा फक्त एवढाच आहे की त्यांनी व्होट चोरीवर प्रश्न विचारला.राहुल गांधींनी पुढे म्हटले की, बापूंनी आपल्याला हेच शिकवले आहे की सत्याच्या आणि अहिंसेच्या मार्गाने लढा, आणि याच गोष्टीला हे सरकार सर्वात जास्त घाबरते. कारण काठीने गर्दी रोखता येईल, लोकांचे प्रश्न नाही. ज्ञानेश कुमार यांना जावेच लागेल आणि ज्या सिस्टीमने त्यांना तिथे बसवले आहे, ती सिस्टीमसुद्धा जाईल.

# नेवासा-श्रीरामपूर मार्गावर भीषण अपघात

## एकाच घरातील तीन भावांचा करुण अंत

युवावार्ता (प्रतिनिधी)

नेवासा - मार्गावर पुनतगाव फाट्याजवळ १ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री ८:३० वाजेच्या सुमारास बुलेट दुचाकी अज्ञात वाहनावर पाठीमागून धडकल्याने घडलेल्या भीषण अपघातात मांळीचिंचोरा येथील आदित्य अंबादास अहिरे (वय १६), दीपक अंबादास अहिरे (वय १४) आणि चैतन्य अंबादास अहिरे (वय १२) या तीन सख्ख्या भावांचा जागीच मृत्यू झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन दुचाकीवरील नावावरून मृतांची ओळख पटवली. मृतदेह नेवासा येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले असून, फॉरेन्सिक व्हॅन पाचारण करून पोलीस स्वतः या प्रकरणाचा गुन्हा नोंदवून पुढील तपास करत आहेत. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की तिघेही नेवासा तालुक्यातील माळीचिंचोरा येथील रहिवासी असून अंबादास अहिरे यांची ही मुले होती. तिन्ही भाऊ आपल्या बुलेट दुचाकीवरून श्रीरामपूरच्या दिशेने जात असताना पुनतगाव फाट्याजवळ समोरील अज्ञात वाहनाला पाठीमागच्या बाजूने तीव्र धडक बसली. धडक इतकी भीषण होती की तिन्ही भाऊ



गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघाताची बातमी मिळताच नेवासा पोलिसांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली. पोलिसांना घटनास्थळी दुचाकीच्या सीटवर 'अहिरे' नाव लिहिलेले आढळल्याने त्यावरून मृतांची ओळख पटवण्यात आली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून तिन्ही मृतदेह उत्तरस्तरीय तपासणीसाठी (शवविच्छेदनासाठी) ग्रामीण रुग्णालय, नेवासा येथे हलवले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तपासासाठी फॉरेन्सिक व्हॅन पाचारण करण्यात आली होती. गुन्हा नोंदवून पोलीस निरीक्षक स्वतः या प्रकरणाचा तपास करत आहेत.

# भोंदू अशोक खरातला चार दिवस पोलिस कोठडी

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - भोंदू अशोक खरात यास आर्थिक फसवणूक प्रकरणी शुक्रवारी (दि. २) येथील जिल्हा व सत्र - न्यायालयात हजर केले असता पुन्हा चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. भोंदू खरातने बनावट खड्याची अंगठी देऊन व्यापारवृद्धीचे आमिष दाखवून अनेकांची आर्थिक फसवणूक केली असून त्याला पाच दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी सरकारी वकिलांनी केली. नेवासा येथील कापड व्यावसायिकाची सोन्याच्या दागिन्यांसह सुमारे अडीच लाख रुपयांची फसवणूक केल्याचे प्रकरण समोर आले होते.

नेवासा येथील कापड व्यावसायिक राजेंद्र भागवत यांना व्यापारवृद्धीचे आमिष दाखवून खरातने सोन्याच्या अंगठ्या आणि सुमारे अडीच लाखांची रोकड घेतल्याचा आरोप आहे. त्यानंतर खरातने भागवत यांना सिद्ध खड्याची अंगठी दिली होती. ही अंगठी धातूची असल्याचे समोर आल्यानंतर भागवत यांनी सरकारवाडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. अशोक खरातवर सरकारवाडा पोलिस ठाण्यात आर्थिक फसवणूक व अत्याचाराचे दहा गुन्हे दाखल आहेत. दरम्यान, पोलिस तपासात खरातने आणखी किती जणांची अशाच पद्धतीने फसवणूक केली आहे, तसेच त्याने घेतलेली रक्कम व सोन्याचे दागिने नेमके कुठे वापरले किंवा लपवून ठेवले आहेत, याचा तपास सुरू आहे.

## दिनविशेष

२०२१: बब्बा वॉलेस — NASCAR प्रमुख शर्यत जिंकणारे पहिले आफ्रिकन-अमेरिकन ड्रायव्हर बनले.

२००६: विकिलिक्स — ज्युलियन असांज यांनी सुरु केले.

१९९२: रोम सामान्य शांतता करार — मोझांबिक देशातील १६ वर्षे चालू असणारे गृहयुद्ध संपले.

१९९१: अंटार्क्टिक करार — पर्यावरण संरक्षणाचा प्रोटोकॉल स्वाक्षरीसाठी खुला झाला.

१९८५: फ्री सॉफ्टवेअर फाउंडेशन — स्थापना झाली.

१९८३: रिचर्ड नोबल — यांनी ब्लॅक रॉक वाळवंट, नेवाडा येथे ६३३.४६८ मैल प्रतितास (१,०१९.४६८ किमी/तास) असा नवीन लँड स्पीड रेकॉर्ड केला.

१९६३: फ्लोरा क्यूबा चक्रीवादळ — फ्लोरा क्यूबा आणि हैतीमध्ये किमान ६ हजार लोकांचे निधन.

१९५७: स्पुतनिक १ — पृथ्वीभोवती फिरणारा पहिला कृत्रिम उपग्रह बनला.

## जन्म

१९९७: रिषभ पंत — भारतीय क्रिकेटपटू

१९६१: काझुकी ताकाहाशी — जपानी लेखक आणि चित्रकार, युगीओहचे निर्माते (निधन: ४ जुलै २०२२ )

१९४५: सेदापट्टी मुथिया — भारतीय राजकारणी, खासदार (निधन: २१ सप्टेंबर २०२२ )

१९४२: जोहान्ना सिगुरर्डोत्तिर — आइसलँडचे राजकारणी, आइसलँड देशाचे २४वे पंतप्रधान

१९३८: विजयपत सिंघानिया — रेमंड समूहाचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक — पद्मभूषण, तेनझिंग नोर्गे राष्ट्रीय साहसी पुरस्कार (निधन: २८ मार्च २०२६ )

१९३८: कर्ट वुथ्रिच — स्विस रसायनशास्त्रज्ञ आणि जैवभौतिकशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार

१९३७: जॅकी कॉलिन्स — इंग्लिश लेखिका व अभिनेत्री

१९३५: अरुण सरनाईक — मराठी चित्रपट अभिनेते, संगीतकार (निधन: २१ जून १९८४ )

१९२८: ऑल्विन टॉफलर — अमेरिकन पत्रकार व लेखक

## मृत्यू

२०२५: संध्या शंतराम — हिंदी चित्रपटातील अभिनेत्री (जन्म: २७ सप्टेंबर १९३८ )

२०२२: शेखर जोशी — भारतीय लेखक (जन्म: १० सप्टेंबर १९३२ )

२०१५: एडिडा नागेश्वर राव — भारतीय दिग्दर्शक आणि निर्माते (जन्म: २४ एप्रिल १९३४ )

२०१४: जीनक्लॉड डुवालियर — हैती देशाचे ४१वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ३ जुलै १९५१ )

२०१३: जॉन क्लाउडस्लेथॉम्पसन — पाकिस्तानी-इंग्रजी कमांडर (जन्म: २३ मे १९२१ )

२०१३: निकोलस ओरेस्को — अमेरिकन सार्जंट — मेडल ऑफ ऑनर विजेते (जन्म: १८ जानेवारी १९१७ )

२००२: भाई भगत — वृत्तपट निवेदक

२०००: मायकेल स्मिथ — इंग्रजी-कॅनेडियन बायोकेमिस्ट आणि अनुवंशशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार (जन्म: २६ एप्रिल १९३२ )

१९९८: एस. आरासरत्नम — श्रीलंकेचे इतिहासकार आणि शैक्षणिक (जन्म: २० मार्च १९३० )

१९९८: जीन-पास्कल डेलामुराझ — स्विस कॉन्फेडरेशनचे ८०वे अध्यक्ष आणि राजकारणी

१९९७: गुंपेई योकोई — जपानी गेम डिझायनर, गेम बॉयचे निर्माते (जन्म: १० सप्टेंबर १९४१ )

१९९३: जॉन कावस — अभिनेते




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**०४ ऑक्टोबर**

## १९८५ : फ्री सॉफ्टवेअर फाउंडेशनची स्थापना मुक्त सॉफ्टवेअर चळवळीची सुरुवात

१९८५ हे संगणक आणि तंत्रज्ञानाच्या इतिहासातील महत्त्वाचे वर्ष मानले जाते. याच वर्षी अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ रिचर्ड स्टॉलमन (Richard Stallman) यांनी Free Software Foundation (FSF) या संस्थेची स्थापना केली. सॉफ्टवेअर वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ते समजून घेण्याचे, बदलण्याचे, इतरांसोबत शेअर करण्याचे आणि स्वतःच्या गरजेनुसार सुधारण्याचे स्वातंत्र्य मिळावे, हा या संस्थेच्या स्थापनेमागील प्रमुख विचार होता.१९८०च्या दशकात संगणक सॉफ्टवेअरचा विकास वेगाने होत होता. मात्र अनेक सॉफ्टवेअर कंपन्या आपल्या प्रोग्रामचा सोर्स कोड वापरकर्त्यांपासून गुप्त ठेवत होत्या. त्यामुळे एखाद्या सॉफ्टवेअरमध्ये बदल करायचा असल्यास किंवा त्यातील त्रुटी दूर करायच्या असल्यास वापरकर्त्यांना मूळ कोड उपलब्ध नसत. स्टॉलमन यांनी या प्रवृत्तीला विरोध केला. सॉफ्टवेअर हे केवळ विकत घेण्याची वस्तू नसून त्याचा वापर करणाऱ्या व्यक्तीला त्यावर काही मूलभूत स्वातंत्र्ये असली पाहिजेत, असा त्यांचा आग्रह होता.FSF ने 'Free Software' या संकल्पनेला व्यापक स्वरूप दिले. येथे 'Free' म्हणजे केवळ मोफत असा अर्थ नसून स्वातंत्र्य (Freedom) असा आहे. वापरकर्त्याला सॉफ्टवेअर कोणत्याही उद्देशासाठी वापरणे, त्याचा अभ्यास करणे, त्यात बदल करणे आणि सुधारित आवृत्ती इतरांसोबत शेअर करणे, ही स्वातंत्र्ये मिळावीत, अशी या चळवळीची भूमिका होती.या विचारातून पुढे GNU Project आणि GNU General Public License (GPL) यांसारख्या महत्त्वाच्या संकल्पना विकसित झाल्या. GPL या परवान्यामुळे सॉफ्टवेअरचा सोर्स कोड उपलब्ध ठेवून त्याचा वापर, अभ्यास, सुधारणा आणि वितरण करण्याला कायदेशीर आधार मिळाला. यामुळे जगभरातील प्रोग्रामरना एकमेकांच्या कामावर आधारित नवीन सॉफ्टवेअर तयार करण्याची संधी मिळाली.फ्री सॉफ्टवेअर चळवळीचा प्रभाव पुढे मोठ्या प्रमाणात वाढला. GNU/Linux सारख्या मुक्त आणि खुल्या सॉफ्टवेअर परिसंस्थेच्या विकासाला या विचारसरणीचा मोठा आधार मिळाला. आज सर्व्हर, सुपरकॉम्प्युटर, इंटरनेट सेवा, विकास साधने आणि विविध डिजिटल प्रणालींमध्ये मुक्त व ओपन-सोर्स सॉफ्टवेअरचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.FSF चे महत्त्व केवळ संगणक प्रोग्रामपुरते मर्यादित नाही. तंत्रज्ञानावर नियंत्रण कोणाचे असावे आणि वापरकर्त्यांचे डिजिटल स्वातंत्र्य किती असावे, या व्यापक प्रश्नावरही या संस्थेने जगभरात चर्चा घडवून आणली.आजच्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा गोपनीयता, डिजिटल हक्क आणि ओपन-सोर्स तंत्रज्ञान याबाबत चर्चा होत असताना १९८५ मध्ये मांडलेली ही स्वातंत्र्याची संकल्पना अधिकच महत्त्वाची ठरते. Free Software Foundation ची स्थापना म्हणजे केवळ एका संस्थेचा जन्म नव्हता; ती संगणक वापरकर्त्यांच्या स्वातंत्र्याच्या जागतिक चळवळीची सुरुवात होती.

## रिषभ पंत — आक्रमक शैलीचा भारतीय क्रिकेटपटू

**जन्मदिन विशेष**

रिषभ पंत हा भारतीय क्रिकेटमधील आक्रमक फलंदाजी, यष्टिरक्षण आणि दबावाच्या परिस्थितीत सामन्याला कलाटणी देण्याच्या क्षमतेसाठी ओळखला जाणारा क्रिकेटपटू आहे. त्याचा जन्म ४ ऑक्टोबर १९९७ रोजी उत्तराखंडमधील रुडकी येथे झाला. लहानपणापासूनच क्रिकेटची आवड असलेल्या पंतने दिल्लीमध्ये क्रिकेटचे प्रशिक्षण घेतले आणि पुढे देशांतर्गत क्रिकेटमध्ये आपल्या कामगिरीची छाप पाडली.पंतची फलंदाजी पारंपरिक पद्धतीपेक्षा वेगळी आहे. तो आक्रमक फटके खेळण्यासाठी प्रसिद्ध असून वेगवान गोलंदाजांपासून फिरकीपटूंपर्यंत विविध प्रकारच्या गोलंदाजीवर धाडसी फटके मारण्याची क्षमता त्याच्यात आहे. यष्टिरक्षक म्हणूनही त्याने सातत्याने प्रगती केली. त्याच्या आक्रमक फलंदाजीमुळे भारतीय संघाला मधल्या फळीत वेगाने धावा करण्याचा पर्याय मिळाला.देशांतर्गत क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केल्यानंतर पंतला भारतीय संघात स्थान मिळाले. २०१७ मध्ये त्याने भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्यानंतर त्याने कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. विशेषतः कसोटी क्रिकेटमध्ये त्याने परदेशातील कठीण परिस्थितीत केलेल्या धडाकेबाज फलंदाजीमुळे वेगळी ओळख निर्माण केली.ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेतील त्याची कामगिरी विशेष उल्लेखनीय ठरली. २०२०-२१ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील गाबा कसोटीत पंतने केलेली संयमी आणि आक्रमक फलंदाजी भारतीय क्रिकेटच्या संस्मरणीय विजयांपैकी एक मानली जाते. या सामन्यात त्याने दबावाखाली उत्कृष्ट खेळ करत भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यानंतर पंतची ओळख



केवळ प्रतिभावान फलंदाज म्हणून नव्हे, तर मोठ्या प्रसंगी मोठी कामगिरी करणारा खेळाडू म्हणून झाली.पंतच्या कारकिर्दीत मात्र एक मोठे आव्हानही आले. डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या गंभीर कार अपघातात तो गंभीर जखमी झाला. त्यानंतर त्याला दीर्घकाळ क्रिकेटपासून दूर राहावे लागले. पुनर्वसन, फिटनेस आणि सरावाच्या कठीण प्रक्रियेतून जात त्याने पुन्हा क्रिकेटच्या मैदानावर पुनरागमन केले. त्याचे हे पुनरागमन भारतीय क्रिकेटमधील प्रेरणादायी घटनांपैकी एक ठरले.पंतने इंडियन प्रीमियर लीगमध्ये (IPL) देखील उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दिल्लीच्या संघासाठी त्याने फलंदाज आणि यष्टिरक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. त्याच्या आक्रमक शैलीमुळे तो आयपीएलमधील लोकप्रिय खेळाडूंपैकी एक बनला.ऋषभ पंतच्या खेळाची सर्वात मोठी वैशिष्ट्ये म्हणजे आत्मविश्वास, आक्रमकता, धाडसी निर्णय आणि दबाव झुगारून खेळण्याची क्षमता. अपयशानंतरही पुन्हा उभे राहण्याची त्याची जिद्द युवा खेळाडूंसाठी प्रेरणादायी आहे.भारतीय क्रिकेटमध्ये यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून आपले स्थान निर्माण करणाऱ्या ऋषभ पंतची कारकीर्द अजूनही सुरू आहे. प्रतिभा, संघर्ष आणि पुनरागमन यांचा संगम असलेला त्याचा प्रवास भारतीय क्रिकेटच्या नव्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी आहे.

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# गांधी-नेहरू विचारांची आज देशाला गरज; माजी मंत्री थोरात

## 'जवाहरलाल हाजीर हो' व्याख्यान आणि पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्य चळवळीला नेतृत्व दिले. त्यांच्या नेतृत्वात पंडित जवाहरलाल नेहरू व सर्व राष्ट्रपुरुषांनी मोठा लढा दिला. आपल्या देशाला इतिहास व विचारांचे मोठे भांडवल असून नवीन तंत्रज्ञानाच्या द्वारे ऑडिओ, रिल्सच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचवावे असे सांगताना ३२५९ दिवस देशासाठी तुरुंगवास भोगलेल्या पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आधुनिक घडविला असल्याचे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य मा.महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयातील के.बी.दादा सभागृह येथे जयहिंद लोकचळवळ व प्रॉमिथीयस प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने जवाहरलाल हाजीर हो या पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक प्रा.रंगनाथ पठारे हे होते. तर व्यासपीठावर मा. आ. डॉ. सुधीर तांबे, साहित्यिक व वक्ते संजय आवटे, दुर्गाताई तांबे, डॉ. मैथिलीताई तांबे, डॉ.राहुल कोसंबी, प्रकाशक प्रमिला माया नारायण, कादंबरीकार श्रीरंजन आवटे, प्रा. हिरालाल पगडाल, प्रा. भगवान अहिरे, प्रा. बाबा खरात, रामहरी कातोरे, प्राचार्य डॉ.बाळासाहेब वाघ, अरुण ताजने, संदीप वाकचौरे, राजाभाऊ आवसक, डॉ.नामदेव गुंजाळ यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या निमित्ताने गांधी, नेहरू विचारांची चर्चा होणे ही आनंदाची बाब आहे. महात्मा गांधीजींनी स्वातंत्र्य चळवळीला नेतृत्व दिले त्यांच्या नेतृत्वात पंडित जी स्वातंत्र्य चळवळीत आले. ३२५९ दिवस त्यांनी तुरुंगवासात घालवले. अहिल्या नगरच्या भुईकोट किल्ल्यात त्यांनी डिस्कवरी ऑफ इंडिया हा अनमोल ग्रंथ लिहिला. पंडितजी हे गांधीजींच्या विचारातून घडले. आधुनिकता आणि तंत्रज्ञान यामधून त्यांनी देश घडविला.

लालबहादूर शास्त्री हे अत्यंत तोला मोलाचे देशाचे व्यक्तिमत्व होते. सोळाव्या वर्षी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणाऱ्या शास्त्रीजींनी ९ वर्ष तुरुंगात घालवले. गांधी, नेहरू विचारांची देशाला व जगाला गरज असून हा विचार आपण तरुण पिढीपर्यंत पोहोचवला पाहिजे आपल्याकडे भांडवल खूप आहे. समाजसुधारक, देशभक्त, राष्ट्रपुरुष संत महात्मे या सर्वांचे विचार आपल्याकडे आहेत. मात्र आपण बोलत नाही आणि त्यांच्याकडे काहीच नाही. मात्र नवीन तंत्रज्ञानातून ते विषारी प्रचार करत आहेत. आपला विचार शाश्वत आणि देशहिताचा असल्याने नवीन तंत्रज्ञान ऑडिओ व झेन झीसाठी रिल्स च्या माध्यमातून हा विचार तरुणांपुढे पोहोचवावा असे आवाहन त्यांनी केले. तर संजय आवटे म्हणाले की, गांधी, नेहरू, आंबेडकर हे भारताला लाभलेले अनमोल रत्न आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली. विरोधकांकडे कोणतेही भांडवल नाही ते सातत्याने नेहरूंवर टीका करत आहेत. नेहरू हे मोठे व्यक्तिमत्व होते. आधुनिकता त्यांच्याकडे होती. बोलण्यास स्पष्टता होती. नवा देश उभारण्याचे काम त्यांनी केले असून सध्याचे सत्ताधारी कोणतेही काम न करता सर्व दोष नेहरुंना देऊन मोकळे होतात. आयुष्यभर देशाची सेवा करणाऱ्या नेहरूनशिवाय भारत ही कल्पना शक्य नाही असे सांगताना आजही विरोधक दररोज नेहरू हाजीर हो म्हणत आहेत म्हणून नेहरूंचा विचार आपण समृद्धपणे पुढे नेला पाहिजे असे ते म्हणाले.

तर प्रा.रंगनाथ पठारे म्हणाले की, गांधी,नेहरू, आंबेडकर हे भारताकडे आहे.पाकिस्तानकडे नाहीत म्हणून त्यांची अवस्था वाईट आहे. ज्यांचा अभ्यास नाही असे मूर्ख लोक नेहरूंवर आरोप करत आहेत. भारताची फाळणी ही इंग्रजांची गरज होती. काश्मीर व इतर प्रश्नांबाबत त्यावेळीची परिस्थिती त्यानुसार निर्णय घेतले गेले. मोठी लोकप्रियता लाभलेले पंडित नेहरू हे परंपरेच्या अधिष्ठानावर उभे राहून आधुनिकतेचा विचार राबवणारे नेते होते.

तर मा.आ.डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, गांधी आणि नेहरूंच्या विचारांवर देशाची वाटचाल सुरू आहे आणि हाच विचार शाश्वत आणि जगासाठी महत्त्वाचा आहे. आधुनिक भारत उभारणारे पंडित जवाहरलाल नेहरू हे विज्ञानवादी नेते होते असे ते म्हणाले.

# जिल्हा बँक निवडणुकीत शिवसेनेला डावलले - खा. वाकचौरे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर बिनविरोध करण्यास शिवसेनेची हरकत नाही. मात्र, बिनविरोध निवडणुकीसाठी सुरू असलेल्या चर्चेत शिवसेना तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना विश्वासात घेतले गेले नाही. संगमनेर येथे झालेल्या बैठकीलाही शिवसेनेला निमंत्रित करण्यात आले नाही. त्यामुळे जिल्हा बँक निवडणूक प्रक्रियेत शिवसेनेला जाणीवपूर्वक डावलले. असा आरोप खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी केला.



संगमनेर येथील आ. अमोल खताळ यांच्या जनसंपर्क कार्यालयात शुक्रवारी (दि. २) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी आमदार अमोल खताळ, मुकुंद शिनगर, बाळासाहेब पवार आदी उपस्थित होते. खा. वाकचौरे म्हणाले, दुष्काळाची परिस्थिती लक्षात घेता जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, याला आमची हरकत नाही. मात्र त्यासाठी सर्व घटकांना विश्वासात घेऊन चर्चा होणे अपेक्षित आहे. शिवसेनेला सुरुवातीपासूनच या प्रक्रियेपासून दूर ठेवण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही चर्चेत सहभागी करून घेण्यात आले नाही. संगमनेर येथे झालेल्या बैठकीला शिवसेनेला बोलावण्यात आले नाही. या प्रकाराबाबत शिवसेनेची स्वतंत्र बैठक झाली असून पुढील भूमिका ठरविण्यात येईल.

नाशिक-पुणे रेल्वे संगमनेर मार्गे व्हावी, यासाठी शिवसेनेकडून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. या प्रश्नासाठी दिल्ली येथे अनेक केंद्रीय मंत्र्यांच्या भेटी घेतल्या आहेत. रेल्वे मार्गाचा सुरुवातीचा आराखडा वेगळा होता. मात्र नारायणगाव येथील रेडिओ दुर्बिणीच्या तांत्रिक अडथळयामुळे मार्गाबाबत बदलाची चर्चा सुरू झाली.

आता या प्रश्नाबाबत राज्य सरकारने पुढाकार घेऊन अडथळा दूर करणे गरजेचे आहे. रेल्वे मार्गाचा चेंडू आता राज्य सरकारच्या कक्षेत गेला आहे. राज्य सरकारने याबाबत निर्णय घ्यावा. आम्हीही जनतेसोबत राहून आंदोलन करणार असून दिल्ली दरबारी पाठपुरावा सुरूच ठेवणार आहोत, असे खा. वाकचौरे यांनी स्पष्ट केले. नाशिक-पुणे रेल्वेच्या मूळ मार्गासाठी स्थानिक पातळीवर आंदोलन आणि पाठपुरावा सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.

पत्रकार परिषदेचा एक प्रमुख उद्देश शिर्डी येथे ९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्याची माहिती देणे हा असल्याचे खा. वाकचौरे यांनी सांगितले. ग्रामीण भागातील बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला असून आतापर्यंत सुमारे ५०० तरुणांनी नोंदणी केली आहे.

आ. खताळ म्हणाले, संगमनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदासाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# दुष्काळात साधेपणाने सोहळे करा - मुख्यमंत्री

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केल्यानंतर राज्य सरकारने मदतकार्याला सुरुवात केली आहे. दुष्काळाच्या परिस्थितीत प्रत्येकाने संवेदनशीलता दाखवून अनावश्यक खर्च टाळावा, तसेच उपलब्ध पाण्याचे नियोजन करून भविष्यातील पाणीटंचाईला सामोरे जाण्याची तयारी करावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. दरम्यान, मोठ्या धरणांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा जुलै-ऑगस्ट २०२७ पर्यंत पुरेल, अशा पद्धतीने नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



दुष्काळ जाहीर केलेल्या २६५ तालुक्यांमध्ये सरसकट मदत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. दुष्काळाच्या उपाययोजनांसाठी जाहीर करण्यात आलेल्या १२ तातडीच्या उपायांना मान्यता मिळाली असून, 'फर्स्ट ट्रिगर'नुसार आदेश काढण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आवश्यक आहे, तेथे पंचनामे सुरू करण्यात आले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती मदत देण्यासाठी पुढील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.दुष्काळाच्या यादीत काही तालुके समाविष्ट झाले नसल्याच्या तक्रारी सरकारकडे येत आहेत. या तालुक्यांचीही पाहणी केली जाणार आहे.

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर लग्न समारंभ आणि इतर कार्यक्रमांमध्ये खर्च कमी करण्याबाबत बोलताना फडणवीस यांनी नागरिकांना संवेदनशीलतेचे आवाहन केले. दुष्काळाच्या परिस्थितीमध्ये संवेदनशीलता ठेवणे आवश्यक आहे. थोडा खर्च कमी करणे किंवा आवश्यक गोष्टींवरच खर्च करणे गरजेचे आहे, काही आवश्यक बाबींवरील खर्च करावाच लागतो. मात्र, ज्या गोष्टी टाळता येऊ शकतात किंवा कमी प्रमाणात करता येऊ शकतात, त्या कमी कराव्यात. त्यातून होणारी बचत दुष्काळग्रस्तांसाठी मदतीच्या स्वरूपात वापरता येऊ शकते. केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर इतर स्वरूपाची मदतही नागरिकांनी करावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.**

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)

सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध

- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)

02425 - 224761, मोबा. 7038170382

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

दर्शन
टेक्सटाईल मार्केट
सेल... सेल... सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
शालू | कांजीवरम | सिल्क पैठणी | बनारसी
आकर्षक साड्यांची असंख्य रेंज..
संपर्क :- 8390005001
पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
- सर्जरी विभाग
- डायलिसीस विभाग
- हृदयरोग विभाग
- जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग
- सुपर स्पेशालिटी विभाग
- मेडिसीन विभाग
- स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग
- न्यूरोविभाग
- अद्ययावत कॅथलॅब
- मॉड्युलर ऑपरेशन थिएटर

सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25